A MINOR RESEARCH PROJECT

(Subject : Commerce)

"A Coreletive Study of District Planing & Lower Human Development Index With Special Reference To Buldana District."

"जिल्हा नियोजन आणि मानव विकास निर्देशांकाच्या सहसंबंधाचे अध्ययन, बुलडाणा जिल्ह्याच्या संदर्भात"

Submitted For

Financial Assistance to
University Grants Commission
Western Regional Office
Ganesh Khind Pune – 411007

-* Research Person *-

Dr. Uday Shrikrushana Kale

M.Com., M.A.(Eco.), M. Phil.(Com.), Ph.D..

M.E.S. Arts & Com. College,Mehkar. Dist-Buldna

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक
प्रकरण : 1 जिल्ह्यांचा इतिहास, रचना व लोकसंख्या आणि संशोधन पध्दती	3–9
प्रकरण : 2 मानव विकास संकल्पना व आगणन	10–18
प्रकरण : 3 जिल्हा नियोजन, विभागीय व जिल्हा अनुशेष आणि तथ्य विश्लेषण	19–31
प्रकरण : 4 निष्कर्ष व उपाययोजना	32–45
परिशिष्टे :	46
अ) संदर्भसूची	
ब) सर्वेक्षणाची प्रश्नावली/अनुसूची	

प्रकरण – 1

बुलडाणा जिल्ह्याचा इतिहास, भौगोलीक रचना व लोकसंख्या आणि संशोधन पध्दती

1.1 प्रस्तावना :– संशोधन विषयातंर्गत बुलडाणा या जिल्ह्याचा मानव विकास व जिल्हा नियोजन याचा अभ्यास करणार आहोत. त्यामुळे या प्रकरणाच्या पहिल्या भागामध्ये आपण बुलडाणा जिल्ह्याचा इतिहास व भौगोलिक रचना, लोकसंख्या आणि लोकसंख्येतील वाढ, घट, लोकसंख्येची घनता, ग्रामीण लोकसंख्या आणि ग्रामीण लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण, वाढते शहरीकरण, मनुष्यबळ, अनु.जाती जमातीचे प्रमाण यांची तर दुस–या भागामध्ये संशोधन पध्दतीची चर्चा करणार आहोत.

1.1.1 बुलडाणा जिल्ह्याचा इतिहास व भौगोलिक रचना :–

बुलडाणा जिल्ह्याचे मुख्यालय बुलडाणा शहर असून सन 1867 पूर्वी येथे लहानशी भिल्ल समुहाची वस्ती होती. म्हणून या गावाचे नाव भिलठाणा असे होते. पूढे त्याचे नामकरण बुलडाणा असे झाले. बुलडाणा शहर हे अंजिठा पर्वत रांगाच्या टोकावर सन 1867 मध्ये इंग्रजांनी वसविले. त्यामुळे बुलडाणा शहराची रचना थोड्याफार प्रमाणात चंदिगढ या शहरासारखी आहे.

बुलडाणा शहराची समुद्रसपाटी पासूनची उंची 363 मीटर आहे. हा जिल्हा उत्तर अक्षांश 19.51 ते 21.17 अंश आणि पूर्व रेखांश 75.51 ते 76.59 अंशाच्या दरम्यान आहे. जिल्ह्याचे क्षेत्रफळ 9,661 चौ.कि.मी. असून राज्याच्या क्षेत्रफळाच्या 3.14 टक्के इतके आहे. प्रशासकीय व्यवस्थेसाठी 13 तहसिलची, 5 महसूल विभागांमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. ग्रामीण विकासाकरिता 13 पंचायत समित्या असून 2001 च्या जनगणनेनुसार एकूण 11 शहरे 1297 वस्ती असलेले व 136 ओसाड गावे आहेत.

जिल्ह्यात खडकपूर्णा, पैनगंगा, नळगंगा, विश्वगंगा, बाणगंगा, कोराडी, मस या प्रमुख नद्या आहेत. जिल्ह्यातील जमीन (मृदा) भरकाळी, मुरमाड व बरडी अशा तीन प्रकारची आहे. जिल्ह्यात एकूण 1165 चौ.कि.मी. वनक्षेत्र आहे. जिल्ह्याच्या एकूण 9,67,099 हेक्टर जमीनीपैकी कृषी लागवडीकरिता लायक 7.72 हजार हेक्टर क्षेत्रापैकी 7.12 हेक्टर निव्वळ पिकाखालील क्षेत्र आहे. जिल्ह्यात प्रामुख्याने सोयाबीन, कापूस, ज्वारी, गहु, तुर, मुंग, भुईमुंग ही पिके घेतली जातात. जिल्ह्यात उद्योगाकरिता खामगाव, चिखली,मलकापूर येथे औद्योगिक वसाहती आहेत. खामगाव व मलकापूर शहरामध्ये मोठे उद्योग असून, जिल्ह्यात 5 सूतगिरण्या व 5 साखर कारखाने आजारी अवस्थेत आहेत. हा जिल्हा उद्योगाच्या दृष्टीकोनातून मागासलेला आहे. शिक्षण व प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी कमी आहेत. त्यामुळे मानव विकास निर्देशांक कमी आहे.

1.2 संशोधन पध्दती **(Research Methodology)** :–

पहिल्या प्रकरणाच्या संशोधन पध्दती या दुस–या भागामध्ये समस्या सुत्रण, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाचे ध्येय, संशोधनाची गृहितकृत्ये, तथ्यसंकलन, मानव विकास निर्देशांक आगणनाची पध्दती,प्राथमिक तथ्यांच्या सर्वेक्षणाची व आगणनाची पध्दती याची चर्चा करणार आहोत.

1.2.1 समस्या सुत्रण अथवा संशोधन विषय निवडीमागील पार्श्वभूमी :–

एक प्रगतीशील व विकसीत राज्य असा महाराष्ट्राचा लौकीक राहीला आहे. 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्य म्हणून अस्तित्वात आल्यानंतर या 48–49 वर्षामध्ये राज्याने विविध क्षेत्रात केलेली कामगिरी प्रशंसनिय आहे महाराष्ट्र राज्याचे दरडोई उत्पन्न जवळ जवळ 32000 रूपयांच्यावर आहे. देशाच्या इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राचा विकासाच्या संदर्भात बराच वरचा क्रमांक लागतो. गेल्या दोन–तीन वर्षापासून आर्थिक विकासाचा वेग देखील 8 ते 9 टक्क्यांमध्ये स्थिरावला आहे. एवढे असूनही या विकासाचा समाजातील सर्व स्तरांना/विभागांना सारखाच फायदा झालेला नाही. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी विविध उपाययोजना सरकारद्वारा करण्यात आल्या, परंतु त्यांचा देखील अपेक्षित परिणाम झालेला दिसून आला नाही.

गेल्या दशकाच्या काळात मानव विकास संकल्पनेचा उगम होऊन ती विकसीत झाली. सयुंक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या धर्तीवर भारताच्या विविध राज्यामध्ये मानव विकास निर्देशांक अहवाल प्रसिध्द करण्याची परंपरा निर्माण झाली. भारत सरकारने सन 1999 मध्ये भारताचा मानव विकास अहवाल प्रसिध्द केला. त्यानंतर महाराष्ट्राने देखील महाराष्ट्र राज्याचा स्वतंत्र पहिला मानव विकास अहवाल 2002 प्रसिध्द केला.

भारताच्या मानव विकास अहवालानुसार, महाराष्ट्र राज्याची क्रमवारी सन 1981 मध्ये तिसरा (मा.वि.नि. मुल्य 0.363) तर सन 1991मध्ये चौथ्या क्रमांकावर (मा.वि.नि. मुल्य 0.452) आणि सन 2001 मध्ये सुध्दा चौथ्या क्रमांकावर (मा.वि.नि. मुल्य 0.523) होता. महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या, 'मानव विकास अहवाल महाराष्ट्र' यामध्ये महाराष्ट्र हे राज्य देशातील प्रगत व उच्च उत्पन्न असलेल्या अनेक राज्यांपैकी एक असल्याचे दिसून आले. परंतु या अहवालानुसार विषमतेचा, प्रादेशिक व सामाजिक विकासाचा समतोल राखला गेला नाही, हे सत्य समोर आले. त्यामुळे सामाजिक विकासाचा हा असमतोल का निर्माण झाला? विकसीत व पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील बुलडाणा जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक राज्याच्या सरासरीपेक्षा कमी का आहे ? अनुशेष, जिल्हा नियोजन आणि मानव विकास यांचा सहसबंध आहे काय? याचे सखोल अध्ययन होणे आवश्यक आहे आणि हीच खरी पार्श्वभूमी या संशोधन विषय निवडीमागील आहे.

1.2.2 संशोधन विषयाचे महत्त्व (**Importants of Present Study**) :–

प्रस्तुत लघुसंशोधन प्रकल्पाचे महत्त्व व्यक्तिगत आणि सार्वजनिक अशा दोन्ही स्तरावर राहील. संशोधन हे ज्ञान मिळविण्याच्या उद्देशाने केले जाते. त्याचबरोबर सामाजिक संशोधन हे सामाजिक जीवनाशी सबंधीत असते म्हणून मानव विकास, आरोग्य, शिक्षण, लिंगभेद प्रश्न, अनुशेष, दरडोई उत्पन्न, जिल्हा नियोजन या संदर्भात काही महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविल्या आहेत. याबाबत सबंधित यंत्रणा जसे, जिल्ह्यातील नागरिक, गैर–सरकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था व शासन इत्यादीकरिता प्रस्तुत संशोधनाची उपयोगिता राहील. सुचविलेल्या उपायोजनांची अंमलबजावणी संबधित यंत्रणेमार्फत झाल्यास या जिल्ह्याचा मानव विकास वृद्धींगत होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनाची उपयोगिता सिद्ध होऊ शकेल.एकूणच व्यक्तीगत व सार्वजनिक पातळीवर प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्त्व अनन्यसाधारण राहील.

1.2.3 संशोधनाचे ध्येय (**Aims of Study**) :–

महाराष्ट्रातील एकूण 12 जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक हा तुलनेत अत्यंत कमी आहे. त्यापैकी 5 जिल्हे हे विदर्भातील असून बुलडाणा जिल्हा पश्चिम विदर्भातील आहेत. या जिल्ह्याचा महाराष्ट्रच्या मानव विकास अहवाल 2002 नुसार मानव विकास निर्देशांक 0.41 इतका आहे. हा निर्देशांक महाराष्ट्र राज्याच्या 0.58 सरासरी निर्देशांकाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. या अहवालानुसार या जिल्ह्यांचे क्रमांक (Rank) 27 इतका आहे. या जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी असण्याची नेमकी कारणे कोणती? त्या कारणांची मिमांसा व त्यावर उपाययोजना सुचविणे हे संशोधनाचे ध्येय आहे.

1.2.4 संशोधनाची उद्दिष्टे (**Objectives of Present Study**) :–

1) पश्चिम विदर्भातील बुलडाणा या जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकाचे विश्लेषण करून तुलनात्मक अध्ययन करणे.

2) बुलडाणा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचे विविध निकष अभ्यासणे.

3) जिल्हा नियोजन समितीची रचना, कार्ये, अधिकार याविषयी अध्ययन करणे.

4) विदर्भाच्या वाढत्या अनुशेषामध्ये या जिल्ह्याचा अनुशेष किती रूपयांचा व त्याचे प्रमाण किती? आहे हे अभ्यासणे. तो अनुशेष दूर करण्याकरिता करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.

5) बुलडाणा जिल्ह्याकरिता शासनाने जिल्हा नियोजन समितीमार्फत विविध योजनाकरिता, विविध लेखाशिर्षांतर्गत केलेली तरतूद, अर्थसंकल्पीत निधी, योजनातंर्गत खर्च करण्यात आलेला निधी यांचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

6) बुलडाणा जिल्ह्याच्या आरोग्य, शैक्षणिक व उत्पन्नविषयक विषमतेचा अभ्यास करणे.

1.2.5 संशोधनाची गृहितकृत्ये (**Hypothesis of Research**) :— या संशोधन कार्याकरिता खालील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत. या गृहितकांची पडताळणी करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत. अध्ययनाची गृहितकृत्ये पुढीलप्रमाणे आहेत.

1) बुलडाणा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक आणि महाराष्ट्राचा सरासरी मानव विकास निर्देशांक यामध्ये लक्षणिय फरक नाही.

2) शासनाकडून या जिल्ह्यांच्या विकासाकरिता पुरेश्या निधीची तरतूद केली जाते व ती खर्च केली जाते.

3) बुलडाणा जिल्ह्यातील भौगोलिक व नैसर्गीक संसाधनाचा उपलब्ध स्त्रोत लक्षात घेवून मानवी भांडवल वाढविण्याचा प्रयत्न करण्याकरिता योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

4) बुलडाणा जिल्ह्याचा अनुशेष आणि मानव विकास निर्देशांक यांचा सहसंबंध आहे.

1.2.6 तथ्यसंकलन (**Data Collection**) :— प्रस्तुत अध्ययनाकरिता संशोधन कार्याचे संघटन करून आवश्यक ती तथ्य/समंक संकलीत करण्याकरिता प्राथमिक आणि द्वितीय तथ्य संकलन स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला.

1.2.6.1 प्राथमिक तथ्यांचे संकलन (**Collection of Primery Data**) :— या अध्ययनाकरिता प्राथमिक तथ्यांचा सुध्दा उपयोग करण्यात आला आहे. याकरिता सूक्ष्म स्तरावर ग्रामस्थ, शेतकरी, व्यावसायिक, उद्योजक, नोकरदार इत्यादी. नागरिकांशी चर्चा करून आवश्यक ती माहिती प्राप्त करण्यात आली. प्राथमिक तथ्यांचे संकलन अनुसूचीव्दारे करण्यात आले आहे. याकरिता अभ्यासक जिल्ह्यामधील प्रत्येक तालुक्यातून दैव नमूना निवड पध्दतीनुसार प्रातिनिधीक लाभार्थ्यांची निवड करण्याकरिता दोन गावे (एक ग्रामीण व एक अर्धशहरी) निश्चित केले. त्या प्रत्येक गावातून 10 प्रतिनिधीक लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. अश्याप्रकारे बुलडाणा जिल्ह्यातील 13 तालुक्यामधून प्रत्येकी वीस याप्रमाणे एकुण 260 लाभार्थ्यांची निवड केली. ही नमुना निवड संस्तरीत प्रकारची आहे. या प्रतिनिधिक लाभार्थ्यांकडून लिंगभेद प्रश्न, आरोग्य, शिक्षण व आर्थिक विकासाबाबत तथ्य संकलित करण्यात आले.

अश्याप्रकारे प्रस्तुत संशोधानात अनुसूचीचा उपयोग करण्यात आला. अध्ययन विषयाचे उद्देश लक्षात घेऊन अध्ययन विषयाशी संबधीत एक शास्त्रशुध्द मुलाखतसूची तयार करून त्याव्दारे तथ्यसंकलन करण्यात आले.

2.1.6.2 द्वितीय तथ्यांचे संकलन (**Collection of Secondary Data**) :— द्वितीय तथ्यांचे संकलन करण्याकरीता इंटरनेटच्या विविध संकेतस्थळावरील माहिती, मानव विकासाची संकल्पना, सयुंक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (UNDP) प्रसिध्द केलेले अहवाल, भारताचा सन 1999 चा मानव विकास अहवाल, मानव विकास अहवाल महाराष्ट्र 2002, योजना मासिकातील लेख, महाराष्ट्र शासनाच्या दांडेकर समितीचा आणि अनुशेष व निर्देशांक समितीचा अनुशेषावरील अहवाल, अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी 2008 व 2010,

महाराष्ट्राची संक्षिप्त 2005, महाराष्ट्राचा सांख्यिकीय गोषवारा 2001, जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल इत्यादी. तसेच शिक्षण संचालनालयाचे अहवाल, आरोग्य संचालनालयाचे अहवाल, जिल्हा नियोजन विभागाचे वार्षिक अहवाल इत्यादी. संकलीत करून तथ्यांचा परस्परांशी असलेला संबध तपासून पाहिला. संकलीत माहितीच्या आधारे समस्येचा दृष्टिकोन स्पष्ट झाला आहे.

1.2.7 तथ्यांचे वर्गीकरण व विश्लेषण (**Classification & Analysis of Data**) :– संकलीत केलेल्या तथ्यांचे वर्गीकरण करणे त्यांचे सांकेतीकरण करणे, तथ्यांच्या सारण्या व कोष्टके तयार करणे व त्यानंतर वैज्ञानिक निष्कर्ष काढणे या सर्व गोष्टींचा समावेश विश्लेषणाच्या प्रक्रियेत होतो.संकलित केलेल्या सामग्रीचे विश्लेषण करण्याकरिता प्रथम आवश्यक ती सूत्रे उपयोगात आणून तक्ते (कोष्टके) आणि सारण्या तयार केल्या. प्रत्येक सारणीवरून विश्लेषण करणे हे सोपे झाले. विश्लेषणाचा आशय सहज लक्षात येण्याकरिता आवश्यक त्या ठिकाणी आलेख (Graph) दिलेले आहेत. त्याचप्रमाणे द्वितीय तथ्यांच्या स्त्रोतांसंबधीचे संदर्भ नमूद केलेले आहेत.

मुद्दा क्र. 1.2.6 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संकलीत केलेल्या तथ्यांचा उपयोग करून अभ्यासक जिल्ह्यांचा व महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक आगणित करण्यात आला आहे. अभ्यासक जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक काढल्यानंतर महाराष्ट्राच्या सरासरी मा. वि. निर्देशांकात आणि बुलडाणा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकात लक्षणीय फरक आहे काय? हे पाहण्यासाठी सांख्यिकीय तंत्र T-Test चा उपयोग केला आहे. तसेच या जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक व अनुशेष यांचा सहसबंध अभ्यासण्याकरिता, सहसबंध Corelation या तंत्राचा आणि त्याचप्रमाणे जिल्ह्यातील लिंगभेद प्रश्न, आरोग्य, शैक्षणिक, उत्पन्नविषयक विषमतेचे विश्लेषण व अभ्यास करण्याकरिता आणि X^2 (chi-square) Test या सांख्यिकीय साधनांचा उपयोग केला आहे. तसेच विविध मुद्यांवरील आकडेवारीचे विश्लेषण करताना अनुपात विश्लेषण या साधनांचा उपयोग केला आहे.

1.2.8 मानव विकास निर्देशांक आगणनाची पध्दती **(Calculating the Human Devlopment Index)** :– मानव विकास निर्देशांक आगणित करण्याकरिता संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने त्यांच्या अहवालात दिलेल्या निर्देशांकाचा उपयोग केला आहे. त्याप्रमाणे मानव विकासाचे मापदंड व आगणनाची पध्दती पुढीलप्रमाणे.

अ) मापदंड :– कोणत्या देशाच्या/राज्याचा मानव विकास मोजमाप करण्याचे तीन मापदंड आहेत. i) दीर्घ आणि निरोगी जीवन याचे मोजमाप दीर्घ आयुष्य किंवा आयुर्मानाव्दारे काढली जाते. याकरीता आयुर्मानाचा निर्देशांक काढला जातो.

ii) ज्ञान, याचे मोजमाप साक्षरतेचे प्रमाणानुसार केले जाते. यासाठी शैक्षणिक निर्देशांक आगणित केल्या जातो.

iii) राहणीमानाचा दर्जा, याचे मोजमाप राष्ट्रीय स्थूल उत्पन्न/दरडोई उत्पन्नाच्या आधारे केले जाते. याकरिता राष्ट्रीय स्थूल/दरडोई उत्पन्न निर्देशांक काढला जातो.

ब) मानव विकासाचे सूत्रिकरण :– संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने मानव विकास निर्देशांक ठरविण्यासाठी विविध अध्ययनाच्या आधारावर एक सूत्र निश्चित केले आहे. या सूत्रानुसार उपरोक्त निर्देशांकाचे उत्तर हे 0 ते 1 या मूल्यामध्ये येत असते. त्याकरिता पुढील सूत्राचा उपयोग केल्या जातो.

$$\text{निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

क) मानव विकासाचे साध्य करावयाचे उद्दिष्ट :– संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने मानव विकास निर्देशांकांचे आगणन करण्याकरिता खालील कमाल मूल्य व किमान मूल्य निश्चित केले आहे.

निर्देशांक	कमाल मूल्य	किमान मूल्य
1) आयुर्मानाचा निर्देशांक (वर्षात)	85	25
2) साक्षरता/शैक्षणिक निर्देशांक (प्रतिशत प्रमाणात)	100	0
3) दरडोई उत्पन्न निर्देशांक (अमेरिकन डॉलरमध्ये)	40,000	100

ड) मानव विकास निर्देशांकाचे आगणन :– वरील तीन निर्देशांकाचे आगणन झाल्यानंतर त्याची सरासरी म्हणजेच मानव विकास निर्देशांक होय हे सूत्ररूपाने सांगता येईल.

मानव विकास निर्देशांक = 1/3 (आयुर्मानाचा निर्देशांक) निर्देशांक + 1/3 (शैक्षणिक निर्देशांक) निर्देशांक + 1/3 (दरडोई उत्पन्न निर्देशांक)

थोडक्यात अशाप्रकारे मानव विकास निर्देशांकाचे आगणन आगणन केले आहे.

1.9.2 प्राथमिक तथ्यांच्या सर्वेक्षणाची व आगणनाची पध्दती :–

या उपप्रकरणात मुलाखत व अनुसूची या तंत्राचा उपयोग करून संकलित केलेल्या प्राथमिक तथ्यांचे विश्लेषण केले आहे. तसेच द्वितीय तथ्य व प्राथमिक तथ्यांच्या विश्लेषणानंतर अभ्यासक जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक काढला आहे. प्राथमिक तथ्यांच्या संकलनाकरिता जे सर्वेक्षण केले त्याकरिता संस्तरित नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला. सर्वेक्षणासाठी बुलडाणा जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांची निवड करण्यात आली. त्यानंतर प्रत्येक तालुक्यातून दोन गावांची निवड केली. ज्यामध्ये एक ग्रामीण (खेडेगाव) आणि दुसरे नागरी/अर्धशहरी/शहरी अशा स्वरूपाचे आहे. त्या गावातील प्रतिनिधीक लाभार्थी संख्या पुढीलप्रमाणे होती.

जिल्हा	तालुक्यांची संख्या	गावे / शहर	कुटुंबे	प्रतिनिधीक लाभार्थी संख्या
बुलडाणा	13	26	10	260
एकुण	13	26	10	260

अशाप्रकारे 13 तालुक्यांच्या प्रत्येक दोन गावामधून म्हणजेच 26 गावांमधून प्रत्येकी 10 कुटुंबाचे सर्वेक्षण केले. या निवडलेल्या प्रतिनिधीक लाभार्थ्यांमध्ये शेतकरी, व्यापारी, नौकरदार, विविध उत्पन्न गटातील नागरिक व विविध जाती–धर्मातील नागरिक इत्यादींचा प्रमाणबद्ध समावेश करण्यात आला आहे. सर्वेक्षण जानेवारी ते मार्च 2010 या कालावधीतील आहे. सर्वेक्षणाच्या आधारावर प्रत्यक्ष मुलाखत आणि प्रश्नावलीच्या आधारे जमा केलेल्या माहितीचे सारणीकरण करून त्यानंतर विश्लेषण केले आहे.

मानव विकासाचे अध्ययन करतांना यामध्ये प्रामुख्याने कुटुंबप्रमुखाचे वय, व्यवसाय, जात इत्यादींच्या आधारे वर्गीकरण केले. त्याचप्रमाणे कुटुंबातील संख्येनुसार लिंगभेद वर्गीकरण, कुटुंबातील महिलांचा उत्पन्न व निर्णयामधील सहभाग, आरोग्य व स्वच्छतेच्याबाबत, उपलब्ध वैद्यकीय सुविधा, पिण्याचे पाणी, शौचालयाचा वापर इत्यादी तसेच शिक्षणांच्या संदर्भात साक्षर–निरक्षरतेचे प्रमाण, शाळेचा प्रकार इत्यादीबाबत वर्गीकरण व विश्लेषण केले आहे.

अभ्यासक जिल्ह्यातील सामाजिक व आर्थिक स्थितीचे आकलन होण्याकरिता, घरांचे वर्गीकरण, प्रकाश / विद्युत व्यवस्था, आर्थिक विकासावर प्रभाव टाकणारा रोजगार / व्यवसाय व उत्पन्नाचे साधन, जिल्ह्यामधील प्रमुख व्यवसाय असलेल्या शेती / कृषीक्षेत्राबाबत लागवडीचा प्रकार, सिंचनाचे स्त्रोत व स्वरूप याचे वर्गीकरण व विश्लेषण केले आहे. तसेच सर्वेक्षण केलेल्या कुटुंबांचा विविध बाबींवर होणारा वार्षिक खर्च, बचत व गुंतवणूक, शासनाकडून मिळलेले अनुदान इत्यादीचे विश्लेषण केले आहे.

त्याचप्रमाणे सर्वेक्षित केलेल्या कुटुंबप्रमुखाना, विविध योजनाकरिता तरतूद व खर्च केल्या जातो काय? तसेच मानवी भांडवल वाढविण्याकरिता प्रयत्न केले जातात काय? असे प्रश्न विचारून त्याचे सुध्दा विश्लेषण केले आहे.

थोडक्यात अश्याप्रकारे बुलडाणा जिल्हयाचा मानव विकास निर्देशांक आगणीत करून व प्राथमिक तथ्यांचे विश्लेषण करून प्रस्तुत लघुशोध प्रबधामध्ये जिल्ह्या नियोजन व अनुशेष आणि मानव विकास निर्देशांक यांचा सहसबंधाचे अध्ययन करण्यात आले.

प्रकरण – 2

मानव विकास संकल्पना व आगणन

(Concept of Human Development & its Calculation)

2.1 प्रस्तावना :– (Introduction)

आर्थिक विकास म्हणजे केवळ भौतिक साधनांचाच विकास नव्हे, तर भौतिक विकासासोबत मानवी संसाधनांचा विकास देखिल तितकाच किंवा त्याहीपेक्षा जास्त महत्त्वाचा असतो. कारण मनुष्यबळ ही देशाची वास्तविक संपत्ती असल्याने मानव हा आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. पण त्यामुळे तेच विकासाचे साध्य देखिल आहे. हा विचार आता सर्वमान्य झालेला असून, त्यामुळे समाजाचा विकास कितपत झाला आहे. याचे मापन करण्यासाठी वास्तविक राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी उत्पन्नासारख्या पारंपारिक मापदंडाबरोबरच किंवा उत्पन्नाला पर्याय म्हणून शिक्षण, आरोग्य, स्त्री–विकास, इत्यादी मापदंड वापरण्यात येऊ लागले आहेत.

समाजाच्या राहणीमानाचा दर्जा सुधारावा म्हणून 'संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने' (United Nations Development Programme) मानव विकास निर्देशांकानुसार विविध राष्ट्रांची प्रतवारी निश्चित करण्याच्या कामास आता आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरवात केली आहे. आरोग्य शिक्षण आणि इतर मूलभूत सेवांच्या क्षेत्रात त्या त्या राष्ट्राने बजावलेल्या कामगिरीचा विचार करुन हा दर्जा निश्चित केला जातो. त्यामुळे देशाच्या कोणत्या क्षेत्रात सुधारणांना अधिक वाव आहे, यावर प्रकाश पडतो. त्यादृष्टीने त्या क्षेत्रात आवश्यक ते बदल घडविण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न करता येतात. दरडोई उत्पन्न हा विकासाचा एक साधा निर्देशक आहे. पण त्यापासून प्रारंभ करुन आपण आता लोकांच्या राहणीमानाचा दर्जा, अशी सर्वसमावेशक आणि अधिक व्यापक भूमिका स्विकारली आहे. याच भूमिकेला, संकल्पनेला 'मानव विकास' संबोधले जाऊ लागले आहे. याच धर्तीवर 'संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम' दरवर्षी जगातील विविध देशांचा 'मानव विकास अहवाल' तयार करते. तर 'संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने' निश्चित केलेल्या निकषांच्या आधारे अनेक देश, त्यातील विविध राज्य, मानव विकास अहवाल तयार करित आहेत. म्हणूनच अलिकडील काळात 'मानव विकास संकल्पनेला' अत्याधिक महत्त्व प्राप्त झालेले आहे.

2.2 मानव विकास संकल्पना **(Concept of Human Development)** :–

आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी अलीकडील काही वर्षात अर्थशास्त्रज्ञांनी व्यापक निर्देशांक तयार करण्याचे प्रयत्न केलेले आहेत. मॉरिस डी मॉरिस यांनी जीवन विषयक भौतिक गुणवत्ता निर्देशांक (Physical Quality Life Index**)** तयार केला. तसेच पॉल स्ट्रीटन यांनी पायाभूत गरजांचा दृष्टीकोन (Basic Need Approach) यावर भर दिला आहे. या प्रयत्नांच्या परिणामातून संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे (UNDP) मानव विकास निर्देशांकाच्या प्रस्तुतीकरणाचा मार्ग प्रशस्त झाला.

मानव विकास निर्देशांकाची मूळ संकल्पना ही सन 1990 मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमांतर्गत (UNDP) कार्यरत असलेले अर्थतज्ज्ञ महबुब ऊल हक आणि अमर्त्य सेन यांनी मांडली. सन 1990 मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (UNDP) पहिला मानव विकास अहवाल प्रसिद्ध केला. या अहवालामुळे मानवी विकासाचा प्रश्न ऐरणीवर आला आणि त्याची चर्चा होऊन पुढे त्याचे मानव विकास आंदोलनात रुपांतर झाले. मानव विकास संकल्पना स्पष्ट होण्याकरिता बऱ्याच अर्थतज्ज्ञांनी व्याख्या केल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे–

1.**"T**he basic purpose of development is to enlarge people's choices. In Principle, these choices can be infinite and can change over time. People often value ahievements that do not show up at all, or not immediately, in income or growth figures: greater access to knowledge, better nutrition and health services more secure livelihoods, security against crime and physical violence, satisfying leisure hours political and cultural freedoms and sense of participationin community activities. The objective of development is to create an enabling environment for people to enjoy long, healthy and creative lives."**1**

Mahbub ul Haq
(1934-1998)
Founder of the Human Development Report

– ***Mahbub ul Haq.***

महबूब उल–हक यांनी व्यापक अर्थाने सर्वसमावेशक अशी मानव विकासाच्या संकल्पनेची परिभाषा केली असून, ''लोकांना निवडीसाठी उपलब्ध असणाऱ्या पर्यायामध्ये

1. Mahbub UL Haq (1990) - www.http://hdr.undp.org. Human development concept P.1 &

वाढ करण्याची आणि आपापल्या कल्याणाची इष्ट पातळी गाठण्याची प्रक्रिया'' ही मानव विकासाची मध्यवर्ती कल्पना आहे. एखादया देशातील विकासाची पातळी कोणतीही असली तरी लोकांना निवडीसाठी उपलब्ध असणाऱ्या पर्यायामध्ये दीर्घ आणि निरोगी जीवन जगण्याचा, शिक्षण घेता येणे आणि उत्तम राहणीमानाचा दर्जा प्राप्त करण्यासाठी आवश्यक ती साधने मिळविणे, या तीन प्रमुख उद्दिष्टांच्यासंदर्भात उपलब्ध असणाऱ्या वेगवेगळया पर्यायातून हवे ते पर्याय निवडता येणे हा अर्थ पर्याय निवडीच्या स्वातंत्र्यामध्ये अभिप्रेत आहे. त्या बरोबरच राजकीय स्वातंत्र्य, गुन्हे आणि शारीरिक हिंसेपासून संरक्षण, सांस्कृतिक स्वातंत्र्य, सामुदायीक चळवळीत सहभाग, आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य, आत्मप्रतिष्ठा जपण्याचे स्वातंत्र्य, मानवी हक्काचे संरक्षण, स्त्री–पुरुष समानता याबाबी अंतर्भूत आहेत.

थोडक्यात मानव विकास संकल्पनेच्या निवड स्वातंत्र्यात, चांगले अन्न, पाणी (पोषण), शिक्षण, आरोग्य सेवा आणि सुरक्षित पर्यावरणाचा समावेश होतो.

2) ''लोकांना उपलब्ध होणारे निवड स्वातंत्र्य आणि त्यांच्या कल्याणाची पातळी उंचावण्याचे त्यांना उपलब्ध होणारे स्वातंत्र्य अधिक विस्तृत व समावेशक होण्याची प्रक्रिया म्हणजे मानवी विकास होय.''[2]

3) सारांशतः ''लोकांना मिळणाऱ्या संधीचा परीघ मोठा करण्याची प्रक्रिया म्हणजे मानव विकास.''[3]

4) "Human development is the end-economic growth a means. So, the purpose of growth should be to enrich peoples lives." [4]

अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर वाढत असतांनाच सामाजिक कल्याण देखिल साधता आले पाहिजे. म्हणजेच विकास हा सर्वसमावेशक (Inclusive) झाला पाहिजे. समाजातील शेवटच्या माणसाचा विकास हाच खरा विकास होय. एका प्रसिध्द अर्थतज्ञाच्या मते विकास प्रक्रियेत, विकासाच्या संदर्भात "last should be first, first should be last" आणि यातूनच मानव विकास निर्देशांकाची संकल्पना विकसीत होत गेली.

2.3 मानव विकास निर्देशांकाची रचना **(Structure of Human development Index) :-** सामान्यतः आर्थिक वृद्धीचे मापन, राष्ट्रीय उत्पन्न किंवा स्थूल राष्ट्रीय उत्पादन किंवा दरडोई उत्पन्न (Per Capita Income) यामध्ये केले जाते. परंतु मानव विकास या संकल्पनेमध्ये विविध पैलूंचा समावेश होतो. त्यामुळे या संकल्पनेच्या मोजमापाकरिता एखादा निकष अथवा मापदंड तयार करणे तसे कठिणच काम होते. मानव विकासाच्या विविध घटकांचा या निर्देशांकात समावेश होईल असा सर्व समावेशक निर्देशांक तयार करणे गरजेचे

2. डॉ.मुकुंद महाजन व सौ. सुरेखा बेहेरे (2006) अर्थशास्त्र, निराली पब्लिशर्स पुणे पान क्र..2
3. महाराष्ट्र शासन (2002) मानव विकास अहवाल महाराष्ट्र – 2002 पान क्र. 1
4. Abusaleh Shariff (1999) India Human Development Report, OXFORD University Press New Delhi.P

होते. संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (UNDP) मानव विकासाचा मापदंड तयार केला व तो सन 2007–08 या वर्षीच्या मानव विकास अहवालात प्रसिध्द केला.

संयुक्त विकास कार्यक्रमाने तयार केलेला मानव विकास निर्देशांक हा तीन विविध सामाजिक निर्देशांकाचा मिळून तयार झालेला संमिश्र निर्देशांक आहे. त्याचे घटक पुढीलप्रमाणे

1. आयुर्मान **(Longevity)** :– सरासरी आयुर्मानाच्या सहाय्याने दीर्घायुष्याचे मापन केले जाते. जन्मलेले मूल किती वर्ष जगण्याची अपेक्षा करु शकते. या अर्थाने हे सरासरी अपेक्षित आयुर्मान मोजले जाते. दिर्घायुष्याच्या मूल्यमापनासाठी जन्मदर, मृत्यूदर, हे विचारात घेऊन, किमान 25 वर्षे आणि कमाल 85 वर्षे या मर्यादा विचारात घेऊन मूल्यांकन केले जाते.

2. ज्ञान **(Knowledge)** :– ज्ञानाचे मापन हे साक्षरतेच्या प्रमाणावरुन गेले जाते. शिक्षण संपादनाच्या संदर्भात प्रौढ साक्षरतेला दोन तृतीयांश भार आणि शाळेतील नाव नोंदणी,प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाला एकत्रीतपणे एकतृतीयांश भार देऊन दोन्हीबाबत किमान शून्य टक्के ते कमाल शंभर टक्के मूल्य निश्चित केले जाते.

3. राहणीमान **(Standard of Living)** :– वास्तव स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या किंवा पैशातील क्रयशक्तींच्या(वास्तव दरडोई उत्पन्नाच्या) सहाय्याने राहणीमानाचा निर्देशांक निश्चित केला जातो. किमान 100 ते कमाल 40000 अमेरिकन डॉलर असे ठरविले जाते.

मानव विकास निर्देशांकाच्या या तीन घटकांद्वारे मूल्यमापन करून मानव विकास निर्देशांक कसा तयार केला जातो? म्हणजेच त्याच्या आगणनाच्या पध्दतीची (Calculating Methodology) सविस्तर चर्चा प्रकरण क्र. 1 मध्ये करण्यात आली आहे.

2.4 आयुर्मानाचा निर्देशांक :–

आरोग्य आणि पोषण हे मानव समुहाच्या जीवनमानाशी निगडीत असतआरोग्य आणि पोषणाच्या प्रत्येक महत्त्वाच्या मुद्दयांचा मानवाच्या आरोग्यावर, जीवनमानावर कसा प्रत्यक्ष – अप्रत्यक्ष परिणाम होतो, हे अभ्यासले आहे. कुटुंब नियोजन या उपप्रकरणात कुटुंब नियोजनाच्या विविध पध्दतीनी संरक्षित केलेल्या जननक्षम जोडप्यांची संख्या व टक्केवारी यावर प्रकाश टाकला आहे. तसेच नसबंदी शस्त्रक्रियेसंदर्भात नेमक्या कोणत्या अडचणी येतात याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मुलाखतीव्दारे प्रगट झाली आहे. त्याचप्रमाणे जन्मदर, मृत्यूदर, बालमृत्यूदर या उपप्रकरणांमध्ये त्यांचे प्रमाण, वाढ घटीचे प्रमाण, यामानव विकासाच्या निर्देशांकाचे मापन करतांना संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (यु.एन.डि.पी.) अपेक्षित आयुर्मानानुसार दीर्घ व आरोग्यपूर्ण जीवन लक्षात घेवून दिर्घायुष्याचा मापदंड निश्चीत केला आहे. तर महाराष्ट्र शासनाने दिर्घायुष्याचे मापन करतांना बालमृत्यूदर (प्रति हजारमागे) विचारात घेतला आहे. प्रस्तुत लघुशोध प्रकल्पामध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने ठरवून दिलेल्या सूत्राचा आधार घेण्यात आला आहे.

बुलडाणा जिल्ह्यांचा आयुर्मानाचा निर्देशांक खालील सूत्राप्रमाणे काढण्यात आला.

$$\text{आयुर्मानाचा निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य} - \text{किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य} - \text{किमान मूल्य}}$$

संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या अहवालानुसार आयुर्मानाचे कमाल मूल्य 85 वर्ष तर किमान मूल्य 25 असून त्यानुसार जनगणना 1991 आणि सन 2001 च्या आकडेवारी प्रमाणे आगणन करून तुलना केली आहे.

2.4.1 सन 1991 यावर्षीचा आयुर्मानाचा निर्देशांक :–

$$\text{आयुर्मानाचा निर्देशांक} = \frac{64.80 - 25}{85 - 25}$$

$$= \frac{39.80}{60}$$

$$= 0.663$$

(आयुर्मानाच्या आकडेवारीचा स्त्रोत–महाराष्ट्र शासन (2002)–मा. विकास अहवाल महाराष्ट्र पान क्र. 169)

2.4.2 सन 2001 या वर्षीचा आयुर्मानाचा निर्देशांक :–

बुलडाणा जिल्ह्याचा आयुर्मानाचा निर्देशांक :–

$$= \frac{69.23 - 25}{85 - 25}$$

$$= \frac{44.23}{60}$$

$$= 0.737$$

(आयुर्मानाच्या आकडेवारीचा स्त्रोत :– महाराष्ट्र शासन (2010) – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पान क्र. 207)

2.4.3 सन 2011 या वर्षीचा आयुर्मानाचा निर्देशांक :–

बुलडाणा जिल्ह्याचा आयुर्मानाचा निर्देशांक :–

$$= \frac{72.50 - 25}{85 - 25}$$

$$= \frac{47.50}{60}$$

$$= 0.791$$

(आयुर्मानाच्या आकडेवारीचा स्त्रोत :– महाराष्ट्र शासन (2011) – महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पान क्र. 207)

वरील विश्लेषणानुसार बुलडाणा जिल्ह्याचा आयुर्मानाचा निर्देशांक सन 1991 मध्ये 0.663 व सन 2001 मध्ये 0.737 इतका तर 2011 मध्ये 0.791 होता. गत दहा वर्षाच्या दोन दशकामध्ये सुधारणा झालेली दिसून येते.

2.5 साक्षरता / शैक्षणिक निर्देशांक :–

मानव विकासाचे मापन करण्याचा दुसरा घटक म्हणजे शिक्षण. मानवी स्थिती सुधारण्यासाठी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. शिक्षण ही आर्थिक, सामाजिक प्रगतीकडे नेणारी प्रक्रिया तर आहे. तसेच ती मानव सक्षमीकरणाची सुध्दा प्रक्रिया आहे. मानवी भांडवलाच्या उभारणीमध्ये शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे.

साक्षरता व शिक्षणामध्ये आतापर्यंत साक्षरता व शिक्षणाची संकल्पना, साक्षरतेचे प्रमाण, शालेय शिक्षण त्या अनुषंगाने राज्य शैक्षणिक धोरण, सर्व शिक्षा अभियान, महाराष्ट्रातील व बुलडाणा जिल्ह्यातील शाळांची, महाविद्यालयांची, शिक्षकांची संख्या, प्रतिशिक्षक विद्यार्थी गुणोत्तर, शालेय शिक्षणातील गळतीचे प्रमाण, उच्च व तंत्र शिक्षण, प्रौढ शिक्षण याचा सविस्तर आढावा घेतला आहे.शिक्षणातील गळती कमी होण्याकरिता शासनाकडून विविध पातळयांवर विविध योजना आंमलात आणल्या गेल्या आहेत. त्यांचाही आढावा घेतला आहे. केंद्र सरकारच्या शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण यायोजनेअंतर्गत सर्व शिक्षा अभियान राबविले जात आहे. जेणेकरून भारतातील आणि विविध राज्यामधील जनता ही साक्षर होईल आणि निरक्षर लोकांचे प्रमाण कमी होईल. म्हणजेच लोक शिक्षीत, प्रशिक्षीत होऊन रोजगार मिळवून उत्पन्न वाढवितील याकरिता साक्षरतेचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

मानव विकासाच्या तीन मापदंडांपैकी दुसरा मापदंड साक्षरता किंवा शैक्षणिक निर्देशांक होय. या उपप्रकरणात अभ्यासक जिल्ह्याचा साक्षरता / शैक्षणिक निर्देशांक काढून त्यांची तुलना केली आहे.

तक्ता क्र. 2.1

बुलडाणा जिल्ह्याचा साक्षरता / शैक्षणिक निर्देशांक

वर्ष	साक्षरता / शैक्षणिक निर्देशांक (एआयएल)
1991	0.6169
2001	0.7578
2011	0.7927

याच तक्ता क्र. 2.1 मध्ये बुलडाणा जिल्ह्याचा सन 1991 चा शैक्षणिक निर्देशांक 0.6169 इतका होता. तर सन 2001 यावर्षी 0.7578 इतका तर 2011 मध्ये 0. 7927 झाला होता. अभ्यासक जिल्ह्यामध्ये विविध योजनांमधून शैक्षणिक सोयी सुविधा मोठया प्रमाणावर मिळत असल्या, प्रवेशाचे प्रमाण जरी वाढले असले, मूलभूत शिक्षणाच्या विकासाचे निर्देशांक उंचावले असतील तरी शैक्षणिक गळतीचे प्रमाणही तितकेच मोठे आहे. त्याचप्रमाणे माध्यमिक शालान्त परिक्षेतील अनुत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण 50 टक्क्यांच्या जवळपास आहे.

2.6 राष्ट्रीय स्थूल उत्पन्न आणि दरडोई उत्पन्न निर्देशांक (**GDP Per Capita Index** आर्थिक विकास आणि अनुशेष या प्रकरण क्र. 3 मध्ये महाराष्ट्राच्या आणि अभ्यासक जिल्ह्यांच्या आर्थिक बाबींची सविस्तर चर्चा केली आहे. त्यामध्ये राज्य व जिल्हा उत्पन्नाची संकल्पना आणि चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न, यात झालेली वाढ/घट, राज्य व जिल्हा उत्पन्नाची क्षेत्रनिहाय विभागणी, कृषी क्षेत्र व सिंचनाचे प्रमाण, रोजगाराची स्थिती, रोजगार हमी योजना व मनुष्य दिवस, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे व त्याचे प्रमाण, जिल्हा वार्षिक योजना, त्यावरील तरतूदी व खर्च, अनुशेष आणि त्या अंतर्गत तरतूदी व खर्च अशा महत्त्वपूर्ण मुद्दांचा समावेश आहे.

राज्यातील लोकांच्या उत्पन्नात वाढ व्हावी याकरिता शासनस्तरावरून विविध योजना आमंलात आणल्या जातात. लोकांना रोजगार मिळावा, दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण कमी व्हावे. याकरिता शासनस्तरावरून मोठया प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. परंतु हे प्रयत्न योग्य दिशेने केले जात आहेत काय? ते प्रमाणिकपणे केले जातात काय? हे तपासण्याचे विविध मापदंड आहेत. त्यापैकी एक दरडोई उत्पन्न हा आहे. परंतु 1990 ते 2000 च्या दशकात दरडोई उत्पन्न किंवा आर्थिक विकास हा खरा विकास नव्हे तर मानव विकास ही व्यापक संकल्पना जन्माला आली. त्यातील एक महत्वाचा निदर्शक म्हणून दरडोई उत्पन्नाकडे पाहण्यात येऊ लागले. या मानव विकासाच्या मापदंडातील महत्वाच्या दरडोई उत्पन्न निर्देशांकचे मापन खालीलप्रमाणे आगणित केले आहे.

$$\text{GDP Per Capita Index} = \frac{\text{Log (Actual Value) - Log (Minimum Value)}}{\text{Log (Maximum Value) - Log (Minimum Value)}}$$

दरडोई उत्पन्न निर्देशांक काढतांना संयुक्त राष्ट्र विकास संघाच्या अहवालानुसार (UNDP Report) कमाल मूल्य 40,000 अमेरिकन डॉलर आणि किमान मूल्य 100 अमेरिकन डॉलर असे आगणित करण्यात आले आहे. दरडोई उत्पन्नाचे आगणन करताना ते रूपयांमधून अमेरिकन डॉलरमध्ये रूपांतर करण्यासाठी www.rbi.org.in या संकेतस्थळावरील विनिमय दर घेवून रूपांतर करण्यात आले. त्यानंतर दरडोई उत्पन्न निर्देशांकाचे आगणन करण्यात आले. ते तक्ता क्र. 2.2 दर्शविले आहे.

तक्ता क्र. 2.2

बुलडाणा जिल्ह्यांतील दरडोई उत्पन्न निर्देशांक

वर्ष	जिल्ह्यांचा दरडोई उत्पन्न निर्देशांक
1990–91	0.1446
2000–01	0.1901
2010–11	0.2675

बुलडाणा जिल्ह्याचा दरडोई उत्पन्न निर्देशांक सन 1990–91 मध्ये 0.1446 इतका तर 2000–01 मध्ये तो 0.1901 आणि 2010–11 मध्ये 0..2675 इतका होता. या निर्देशांकात सन 1990–91 च्या तुलनेत सन 2000–01 मध्ये 0.0455 अंकानी तर 2010–11 मध्ये सन 2000–01 च्या तुलनेत 0.0374 अंकानी वाढ झाली.

थोडक्यात बुलडाणा जिल्ह्याचा दरडोई उत्पन्न निर्देशांक हा महाराष्ट्राच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. या अभ्यासक जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न कमी असण्याची अनेक कारणे आहेत. त्यापैकी महत्त्वाची, प्राथमिक क्षेत्रावर (कृषी क्षेत्रावर) अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. त्या तुलनेत सिंचनाचे प्रमाण 6 टक्क्यांच्या जवळपास आहे. तर महाराष्ट्राच्या सिंचनाचे सरासरी प्रमाण 18.20 टक्के आहे. त्यामुळे जिल्ह्यामध्ये दुबार पिकांचे प्रमाण कमी आहे. प्राथमिक क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण साधारणतः अभ्यासक जिल्ह्यात 70 टक्के तर राज्याची सरासरी 55 टक्के आहे. प्राथमिक क्षेत्रातील रोजगार हा हंगामी स्वरुपाचा असतो. राज्यातील द्वितीय आणि तृतीय क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण हे जास्त आहे. साध ाारणतः 15 टक्के व 30 टक्के आणि बुलडाणा जिल्ह्यात हे प्रमाण 10 टक्के व 20 टक्क्यांच्या जवळ पास आहे. त्याचप्रमाणे अभ्यासक जिल्ह्यामधील दारिद्र्य रेषेच्याखालील कुटुंबांची संख्या जवळपास 45 टक्के तर महाराष्ट्रातील 35 टक्के आहे.

बुलडाणा जिल्ह्यातील मानवी भांडवल वाढविण्याकरिता कोणतीही स्वतंत्र अशी योजना राबविली जात नाही. तसेच या जिल्ह्यातील अनुशेषाचे प्रमाण हे महाराष्ट्रातील सरासरी प्रमाणापेक्षा कित्येक पटींनी जास्त आहे. एकीकडे राज्य सरकार विधिमंडळात मौद्रीक अनुशेष संपल्याचे जाहीर करते. परंतु प्रत्यक्षात मात्र भौतिक अनुशेष हा मोठ्या प्रमाणावर शिल्लक आहे विशेषतः सिंचनाचा. अश्या विविध कारणामुळे बुलडाणा जिल्ह्याचा दरडोई उत्पन्न निर्देशांक कमी असल्याचे निदर्शनास येते.

2.7 अभ्यासक जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक :–

विकसीत राज्याच्या यादीमध्ये महाराष्ट्र राज्याचा क्रमांक वरचा लागतो. परंतु मानव विकासाच्याबाबत मात्र महाराष्ट्र माघारलेला दिसून येतो. उच्च दरडोई उत्पन्नामुळे तितकाच उच्च मानव विकास झाला असेल असे म्हणता येणार नाही. कारण त्याकरिता काही बाबी कारणीभूत आहे. जसे गरिबीचे प्रमाण, उत्पन्न व संपत्तीचे विषम वाटप, मोठया प्रमाणावरील बेरोजगारी, शिक्षण व आरोग्य, आरोग्य सुविधांचा आभाव, विभागीय अनुशेष इत्यादी. प्रमुख गोष्टींचा उहापोह या पूर्वीच्या प्रकरणांमधून झालेला आहे. तसेच प्राप्त माहितीच्या आधारे मानव विकासाचे जे तीन मापदंड आहेत त्यांचा आणि मानव विकासावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांचाही विचार केलेला आहे. या उपप्रकरणात संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या अहवालातील सूत्राप्रमाणे मानव विकासाचे शिक्षण (ज्ञान), आरोग्य

(दिर्घायुष्य), दरडोई उत्पन्न या निर्देशांकांच्या आधारे महाराष्ट्रातील व अभ्यासक जिल्ह्यांतील मानव विकास निर्देशांकाचे आगणन केलेले आहे. ते तक्ता क्र. 2.3 मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. 2.3

बुलडाणा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक

वर्ष	मानव विकास निर्देशांक
1991	0.474
2001	0.561
2011	0.617

बुलडाणा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक सन 1991 यावर्षी 0.474 इतका, तर सन 2001 मध्ये त्यात वाढ होऊन तो 0.561 आणि सन 2011 मध्ये 0.617 इतका होता. बुलडाणा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकात सन 2001 मध्ये 0.087 अंकाने, तर 2011 मध्ये 0.056 इतकी वाढ झाली. जिल्ह्याच्या निर्देशांकाची महाराष्ट्राच्या सरासरीशी तुलना केल्यास सन 1991 मध्ये 0.039 अंकानी, सन 2001 मध्ये 0.030 अंकांनी, तर 2005 मध्ये 0.038 अंकांनी कमी होता.

थोडक्यात याप्रकरणामध्ये मानव विकास निर्देशांकांची संकल्पना व त्याच्या आगणानुसार बुलडाणा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकांत कशी वाढ झाली याची चर्चा केली आहे.

प्रकरण – 3

जिल्हा नियोजन, विभागीय व जिल्हा अनुशेष आणि तथ्य विश्लेषण

प्रास्ताविक :– प्रकरणाच्या प्रथम भागामध्ये जिल्हा नियोजनांतर्गत जिल्हा नियोजन व विकास समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना कोणत्या आहेत? याचा, तर व्दितीय भागामध्ये विभागनिहाय निर्माण झालेला अनुशेष किती रूपयांचा आहे? व अभ्यासक बुलडाणा जिल्हयाची स्थिती काय आहे? या प्रश्नांची तसेच तिस–या भागामध्ये प्राथमीक तथ्यांचे विश्लेषण याची सविस्तर चर्चा या प्रकरणात केली आहे.

3.1 जिल्हा वार्षिक योजना :– नियोजन हा निव्वळ सुशिक्षित उच्चभ्रुंच्या वैचारीक कुतूहलाशी किंवा आराम खूर्चीत बसून करण्यात येणाऱ्या स्वप्नरंजनाशी व तात्विक मिमांसेशी निगडीत नाही. या राज्यातील कोटयावधी जनतेच्या दृष्टिने अत्यंत जिव्हाळ्याचा विषय आहे. लोकशाही राज्य व्यवस्थेची चौकट कायम ठेवून, व्यापक प्रमाणावर आर्थिक नियोजनाच्या प्रयोग करणारा भारत हा पहिलाच देश आहे. मागील चार दशकांपासून प्रतिकूल परिस्थितीत मागासपणाच्या दलदलीतून वर येण्याकरिता सर्व स्तरावर, 'गर्जा जय जय महाराष्ट्र माझा' झुंजत आहे. आपण समाज या नात्याने प्रत्येक जिल्हावासियांनी नियोजनाची बांधिलकी स्विकारून अंगिकारली पाहिजे नाही तर 'Plan or Perish' या उक्तीप्रमाणे आलेल्या भूकंप, दुष्काळ, महापूर, त्सुनामी सारख्या नैसर्गीक व अनुशेषासारख्या मानवी आपत्तींमध्ये नामशेष व्हायला वेळ लागणार नाही. त्याकरिता आर्थिक समताधिष्ठीत व प्रादेशिक संतुलन साधण्यासाठी सुनियोजनाशिवाय पर्याय नाही. म्हणून वार्षिक योजना या उपप्रकरणात, जिल्हा नियोजन व विकास समितीची रचना, जिल्हा वार्षिक योजना तयार करण्याचे निकष व कार्यपध्दती महाराष्ट्र व अभ्यासक बुलडाणा जिल्ह्यामध्ये आखण्यात आलेल्या योजना व त्यावरील तरतूदी आणि झालेला खर्च इत्यादी महत्त्वपूर्ण मुद्यांची मिमांसा केली आहे.

3.1.2 जिल्हा नियोजन व विकास समितीची रचना :–भारतीय राज्यघटनेच्या 74व्या घटना दुरूस्तीमधील कलम 343 Z (0) नुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये, 'जिल्हा नियोजन व विकास समितीची' स्थापना करण्यात येते. या समितीत पुढील सदस्यांचा समावेश असतो. अध्यक्ष – जिल्ह्याचे पालक मंत्री, सह अध्यक्ष – जिल्ह्यातील मंत्री, सचिव – जिल्हाधिकारी, सदस्य – खासदार, आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष व नामनिर्देशित सदस्य निवडून दिलेले सदस्य, विशेष निमंत्रीत सदस्य इत्यादी. जिल्हा नियोजन व विकास समितीला वर्षातून किमान दोन सभा घेणे आवश्यक आहे.

3.1.3 जिल्हा वार्षिक योजना तयार करण्याचे निकष व कार्यपध्दती :–

जिल्हा योजनेचा प्रारूप आराखडा तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन समित्यांना सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे, आर्थिक व भौतीक उद्दिष्टे आणि मर्यादाही कळविण्यात येतात. त्याकरिता प्रत्येक जिल्ह्याच्या दारिद्र्यरेषेखालील जीवनस्तर, जिल्ह्याची लोकसंख्या, प्रा. वि. म. दांडेकर समितीने दिनांक 30.4.1994 रोजी सादर केलेल्या आणि निर्देशांक व अनुशेष समितीच्या अहवालाप्रमाणे काढून दिलेल्या अनुशेषाचा आधार, तसेच भौगोलिक व आर्थिक मर्यादांच्या आधीन राहून जिल्ह्यांची वार्षिक योजना जिल्हास्तरीय नियोजन व विकास मंडळाने तयार करावयाची असते. वार्षिक योजनेमध्ये 11 क्षेत्रे, प्रत्येक क्षेत्राची काही उपक्षेत्रे ज्यांची संख्या 78 आहे, आणि साधारणतः 250 योजना आहेत. तथापि जिल्ह्यांची स्थानिक गरज लक्षात घेऊन एखादी योजना वार्षिक योजनेमध्ये समाविष्ट करण्यात येते. अशी आर्थिक मर्यादा प्राप्त झाल्यानंतर योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात येतात. या मर्यादेतच योजना तयार करून, 'जिल्हा नियोजन व विकास समितीची'मंजूरी घेऊन राज्य शासनाच्या नियोजन विभागाकडे पाठविण्यात येतात. राज्यस्तरावर आर्थिक मर्यादेची गरज लक्षात घेऊन फेरबदल करण्यात येतात. अशा संपूर्ण जिल्ह्यांच्या लेखाशीर्षनिहाय मंजूर योजना राज्यस्तरीय समितीने मंजूरी दिल्यानंतर या योजना एकत्रित करण्यात येतात. जिल्हा पातळीवरील विकास कार्यक्रमात पुढील बाबींचा समावेश होतो.

1) जिल्हा नियोजन समित्यांनी तयार करावयाच्या नियमीत जिल्हा योजना.

2) स्टेट पूलमधून निधी पुरवावयाच्या जिल्हा पातळीवरील योजना.

3) प्रादेशिक असमतोल (अनुशेष) दूर करण्याच्या कार्यक्रमात अंतर्भूत असलेल्या जिल्हा नियोजन समित्यांनी तयार करावयाच्या जिल्हा पातळीवरील योजना.

4) आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम (राज्यस्तर)

खालीलप्रकारे राज्याची एकत्रित योजना तयार केली जाते. महाराष्ट्रातील जिल्हा पातळीवरील योजनांकरिता सन 2004–05 मध्ये करण्यात आलेली एकूण तरतूद व त्याचे प्रतिशत प्रमाण तक्ता क्र. 3.1 मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. 3.1

महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पातळीवरील योजनांकरिता 2004–05 साठी करण्यात आलेली तरतूद व त्याचे प्रतिशत प्रमाण (रूपये कोटीमध्ये)

अ.क्र	विवरण	तरतूद	प्रतिशत प्रमाण
1	जिल्हा पातळीवरील योजना	1596.52	27.79
2	स्टेटपूल कार्यक्रम (राज्यस्तर)	1672.92	29.12
3	अनुशेषासाठी तरतूद	2182.00	37.98
4	आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम	293.75	05.11
	एकूण नियोजन	5745.19	100

आलेख क्र. 8.3
महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पातळीवरील योजनांकरीता सन 2004–05 मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीचे प्रतिशत प्रमाण



वरील तक्ता क्र. 3.1 व आलेख क्र. 3.1 वर दृष्टिक्षेप टाकला असता असे दिसून येते की, जिल्हा नियोजन समिती एकूण 100% पैकी फक्त 28 टक्क्यांचे नियोजन करू शकते. उर्वरीत नियोजन राज्यस्तरीय नियोजन समिती करते. या 28 टक्क्यांमधील जिल्हानियोजनाच्या मर्यादीत तरतूदीपैकी काही योजनांचा निधी, या केंद्र पुरस्कृत योजनाकरिता राखून ठेवावा लागतो. जसे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना भाग 1 व 2, सुवर्ण जयंती ग्राम स्वंयरोजगार योजना, इंदिरा आवास योजना, अवर्षण क्षेत्र प्रवण कार्यक्रम योजना यांचे केंद्र व राज्याचे प्रमाण 75 टक्के व 25 टक्के आहे. काही कृषी संलग्न योजना, पोषण इत्यादी. केंद्र पुरस्कृत योजनाकरिता जिल्हा पातळीवरील योजनांची जी आर्थिक मर्यादा कळविण्यात येते त्यापैकी 45 ते 50 टक्के निधी राखून ठेवावा लागतो.

उर्वरीत 29.12 टक्क्यांचे नियोजन हे स्टेटपूल कार्यक्रम राज्यस्तर याद्वारा तयार करण्यात येते. आमदारांच्या स्थनिक निधी कार्यक्रम यामधून आमदार स्वतः कामे सुचवितात. यावरून जिल्हा नियोजनाच्या संदर्भात निधीच्या तरतूदी जिल्ह्यांना कळवितांना गाडगीळ समितीच्या सूत्राद्वारे लोकसंख्येच्या आधारे 70 टक्के व निरनिराळया क्षेत्रातील मागासलेपणा याकरिता 30 टक्के निधी वाटप केल्या जातो. यामुळे विकसीत जिल्ह्यांना अधिक निधी प्राप्त होतो. त्याचप्रमाणे जिल्हास्तरीय समित्यांना नियोजनाकरिता आर्थिक मर्यादा 28 टक्के देण्यात येते. त्यातील 45 ते 50 टक्के निधी केंद्र पुरस्कृत योजनांसाठी राखीव ठेवावा लागत असल्याने, जिल्हा नियोजन व विकास समितीला निधीची व

अधिकारांची मर्यादा आहे. मानव विकासासाठी जिल्हा वार्षिक योजनेमध्ये त्या अनुषंगााने विविध योजना सुचविणे, कृती आराखड्यामध्ये मंजूर करून घेणे याला मर्यादा आहेत.

3.1.4 महाराष्ट्र व बुलडाणा जिल्ह्यांतील वार्षिक योजना त्यावरील तरतूदी व खर्च :— महाराष्ट्रामध्ये जिल्हा नियोजनाला 1974 मध्ये सुरूवात झाली. तेव्हापासून प्रत्येक जिल्ह्यांच्यास्तरावर, दरवर्षी जिल्हा नियोजन व विकास मंडळाकडून, जिल्हा वार्षिक योजनांचा आराखडा (प्रारूप) तयार केला जातो. त्याला मंजूरी देऊन, राज्यस्तरावर सर्व जिल्ह्यांचे आराखडे एकत्रित करून राज्य नियोजन मंडळाची मंजूरी घेतली जाते. प्रत्येक जिल्ह्याला लेखाशीर्षनिहाय नियतव्यय मंजूर झाल्यानंतर प्रत्येक विभाग ती तरतूद अर्थसंकल्पीत करून घेण्याचा प्रयत्न करतो. प्राप्त तरतूदीनुसार खर्च केल्या जातो. या मुद्दयांमध्ये आपण महाराष्ट्र राज्याकरिता व अभ्यासक बुलडाणा जिल्ह्याकरिता तयार केलेल्या वार्षिक योजनांचा आढावा, लेखाशीर्षनिहाय केलेली तरतूद, केलेला खर्च व प्रतिशत प्रमाण आणि जिल्ह्यांचा भौगोलिक व नैसर्गिक संसाधनाचा उपलब्ध स्त्रोत लक्षात घेऊन मानवी भांडवल वाढविण्याचा प्रयत्न करण्याकरिता योजना राबविल्या आहेत काय? याची चर्चा करणार आहोत.

महाराष्ट्र राज्याचा योजना निहाय खर्च व त्याचे प्रमाण अवलोकन केले असता कृषी व संलग्न योजनावर फक्त 3 ते 4 टक्के खर्च केल्या जातो. जलसिंचन व वीज या लेखाशीर्षातंर्गत 45 ते 60 टक्के पर्यंत खर्च करण्यात येतो. परंतु प्रत्यक्षात मात्र राज्यात सिंचन क्षेत्रात (सिंचनाच्या प्रमाणात) वाढ झालेली दिसून येत नाही. सामाजिक आणि सामुहिक सेवा या विकासशीर्षातंर्गतच सामान्य शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आरोग्य सेवा, ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता आणि इतर अनेक उपशीर्षक आहेत. त्यावर केवळ 15 ते 20 टक्क्यांच्या आसपास खर्च केला जातो. यावरून असे लक्षात येते की, मानव विकासाचे जे मापदंड आहेत त्या विकासशीर्षावर मूळातच नियतन हे कमी ठेवले जाते व खर्चसुध्दा कमी प्रमाणात केल्या जातो.

अभ्यासक जिल्ह्यांना जितका नियतव्यय मंजूर केल्या जातो. तितका त्या मंत्रालयीन विभागाकडून अर्थसंकल्पीत केल्या जात नाही. तसेच तरतूदसुध्दा उपलब्ध करून दिल्या जात नाही. त्याचप्रमाणे अभ्यासक जिल्ह्यामध्ये खर्चाचे, मंजूर नियतव्ययाशी प्रमाण जवळपास 60 टक्के आहे. तर प्राप्त तरतूदीच्या 70 ते 90 टक्के इतकाच खर्च त्या खात्याकडून केल्या जातो. जिल्हा वार्षिक योजनेमध्ये विकासशीर्ष आणि उपशीर्ष हे राज्य योजनेप्रमाणेच आहेत. एखादी नाविन्यपूर्ण योजना ही जिल्ह्याकरिता अंमलात आणणे, जिल्हा नियोजन समितीला कठिण असते. कारण तसे स्वतंत्र अधिकार जिल्हा नियोजन समितीला नाहीत. त्याचप्रमाणे जिल्ह्यांतील नैसर्गीक संसाधने लक्षात घेऊन मानवी भांडवल वाढविण्याकरिता विशेष अशा योजना आखण्याचे अधिकार सुध्दा जिल्हा नियोजन समितीला

नाहीत. त्यामुळे त्यांना जिल्ह्यांकरिता मंजूर झालेल्या नियतव्ययात व लेखाशीर्षात जिल्हा नियोजन करावे लागते. या मर्यादांमुळे नैसर्गीक संसाधनाचा उपयोग हा मानवी भांडवल वाढविण्याकरिता, रोजगार निर्मीतीकरिता होत नाही.

3.2 विभागीय अनुशेष (**Backlog**) /प्रादेशिक असमतोल :–

1 मे 1960 मध्ये मध्यप्रदेश (सी.पी ॲन्ड बेरार), हैदराबाद व मुंबई प्रांत या तत्कालीक राज्यांमधील मराठी भाषिक प्रदेश एकत्र करून महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाली. या तीन विभागापैकी मुंबई प्रांतातील भाग हा आर्थिक आणि सामाजिक स्तरावर बऱ्यापैकी विकसीत झालेला होता. परंतु येथील मराठी भाषिकांमध्ये स्वतःचा असा उद्योजक वर्ग नव्हता. मध्यप्रदेश प्रांतातील नागपूर शहर वगळता इतर प्रदेश हा कमी विकास झालेला तर हैदराबाद प्रांतातील प्रदेश (मराठवाडा) निजामच्या राजवटीमुळे मागासलेलाच होता. महाराष्ट्र राज्याच्या निर्मीतीनंतर विविध पंचवार्षिक योजनांच्या काळात विदर्भ व मराठवाडा या विभागांवर नियोजनामध्ये सतत अन्याय केला गेला. पश्चिम महाराष्ट्राला नियोजनामध्ये व निधी वाटपात झुकते माप दिल्या गेले. प्राथमिक व द्वितीय क्षेत्राकरिता मोठी धरणे, रस्ते त्या प्रदेशात बांधण्यात आली. साखर कारखान्यांना नेहमीच नियोजनामध्ून मदत केल्या गेली. त्याचप्रमाणे स्टेटपूल कार्यक्रमांतर्गत जास्त निधी दिल्या गेला. तसेच जिल्हा वार्षिक योजनेमध्ये इतर जिल्ह्यांच्या योजनांवरील निधी अर्थसंकल्पीत न करता, तो पुनर्विनियोजनामध्ये विशिष्ट जिल्ह्यांकडे वळती करण्यात आला. परिणामतः एका कालावधीनंतर राज्यामध्ये मोठया प्रमाणावर प्रादेशिक असमतोल निर्माण झाला.

या प्रादेशिक असमतोलाचा आणि मानव विकासाचा निकटचा सहसबंध आहे. हा सहसंबंध कसा आहे? याचा उहापोह पुढील मुद्यामध्ये केला आहे. परंतु तत्पूर्वी या उपप्रकरणात राज्यातील नेमका अनुशेष किती आहे? अनुशेषाचे आगणन करण्याकरिता कोणकोणत्या समित्या स्थापन केल्या गेल्या? त्यांच्या अहवालाप्रमाणे असलेला विभागनिहाय, क्षेत्रनिहाय अनुशेष, वैधानिक विकास मंडळाची स्थापना, मा. राज्यपालांना निधी वाटपाचे अधिकार, अभ्यासक बुलडाणा जिल्ह्यामधील अनुशेष दूर करण्याकरिता करण्यात आलेले प्रयत्न, अनुशेष कमी करण्याकरिता करण्यात आलेल्या तरतूदी, झालेला खर्च, भौतिक अनुशेष इत्यादी मुद्दयांवर सविस्तर चर्चा केली आहे. त्यामुळे अभ्यासक जिल्ह्याचा अनुशेष आणि मानव विकास निर्देशांक यांच्या सहसंबधावर प्रकाश टाकण्यास निश्चित मदत होईल. म्हणून अनुशेष या उपप्रकरणात उपरोक्त मुद्दयांवर पुढीलप्रमाणे चर्चा केली आहे.

3.2.1 दांडेकर/सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार अनुशेष :–राज्यातील विविध विभागांच्या विकासातील असमतोलाचा अभ्यास करण्याकरिता व विकासातील विभागीय अनुशेष निश्चित करण्याकरिता शासनाने, डॉ. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली ऑगस्ट 1983 मध्ये एका सत्यशोधन समितीची स्थापना केली. या समितीला फक्त अनुशेष निश्चित

करावयाचा नव्हता. तर तो दूर करण्यासाठी उपाययोजना सुचवावयाच्या होत्या. त्याचप्रमाणे यापुढे असा अनुशेष निर्माण होऊ नये म्हणून दूरगामी उपाययोजना सुध्दा सुचवावयाच्या होत्या. या समितीचा अहवाल शासनाकडे जून 1984 मध्ये प्राप्त झाला. सत्यशोधन समितीने एकूण 3186.78 कोटी रूपयांचा अनुशेष अंदाजित केला होता.

आलेख क्र. 8.4

विभागनिहाय अनुशेषाचे प्रतिशत प्रमाण



आलेखानुसार विभाग निहाय अनुशेषापैकी सर्वात जास्त विदर्भ विभागाचा 39.12 टक्के म्हणजेच 1246.55 कोटी रूपयांचा, तर सर्वात कमी बृहन्मुंबई विभागाचा 0.30 टक्के, अर्थात 9.71 कोटीचा अनुशेष शिल्लक होता. कोकण विभागाचा 295.62 कोटी रूपयांचा 9.28 टक्के, पश्चिम महाराष्ट्रचा 884.05 कोटी रूपयांचा 27.74 टक्के आणि मराठवाडा विभागाचा 750.85 कोटी रूपयांचा 23.56 टक्के यावरून दांडेकर सत्यशोधन समितीने दिलेल्या अहवालानुसार 3186.70 कोटी रूपयांच्या अनुशेष असल्याने विकासाच्या बाबतीत प्रादेशिक असमतोल निर्माण झाला होता हे निश्चित झाले.

3.2.2 सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार असलेला अनुशेष दूर करण्याकरिता करण्यात आलेल्या तरतूदी व खर्च :– यानंतर सत्याशोधन समितीच्या अहवालातील सूचना व शिफारशी तसेच अनुशेष मापनाचा दृष्टीकोन व निकष याचा अभ्यास करण्याकरिता शासनाने एक शक्ती प्रदान समितीची नियुक्ती केली. शक्तीप्रदान समितीने आपला प्रस्ताव शासनास एप्रिल 1987 मध्ये सादर केला. सत्यशोधन समितीने निश्चित केलेला विभागीय असमतोल कालबध्दरितीने दूर करण्याच्या उपाययोजना करण्यात याव्यात. त्यानुसार सत्यशोधन समितीने दर्शविलेला अनुशेष दूर करण्याकरिता वार्षिक योजना सन 1985–86पासून विकास क्षेत्रनिहाय स्वतंत्र तरतूदी करण्यात आल्या. त्यानुसार विभागीय अनुशेष दूर करण्याकरिता सन 1985–86 ते 2005–06 या कालावधीत उर्वरित महाराष्ट्राच्या एकूण

मंजूर तरतूदींपैकी 64.08% खर्च, मराठवाडा विभागामध्ये 70.78%, तर विदर्भाच्या जिल्ह्यांमध्ये एकूण मंजूर तरतूदीपैकी 67.18% खर्च करण्यात आला. महाराष्ट्रात एकूण अनुशेषाकरिता 1763.93 कोटी रूपये तरतूद करण्यात आली. तर खर्च 11804.63 कोटी रूपये करण्यात आला. त्याचे प्रमाण 66.94% इतके होते.

या 20 वर्षाच्या कालावधीत आर्थिक अनुशेष दूर करण्याचा बराच प्रयत्न झाला. परंतु विविध प्रकल्प निधीअभावी रखडल्यामुळे, त्यांच्या अंदाजपत्रकात झालेली वाढ, विदर्भ व मराठवाडयाच्या सिंचनाच्या क्षेत्रात न झालेली वाढ, तसेच अनुशेषावर संपूर्ण न झालेला खर्च, यामुळे अनुशेषाचा अनुशेष निर्माण झाला. त्यामुळे अनुशेष निर्मुलनामध्ये संपूर्ण यश साधता आले नाही.

3.2.3 अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालानुसार अनुशेष :– यानंतर 1994 मध्ये भारतीय घटनेतील कलम 371(2) अन्वये राज्यात विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याची विशेष जबाबदारी, महामहिम राष्ट्रपतींनी राज्यपालावर सोपवली. घटनेतील या कलमान्वये विभागीय असमतोल दूर करून विकासाची आणि प्रगतीची हमी देण्यात आली. हा अनुशेष दूर करण्याकरिता निधी वाटपाचे अधिकार मा. राज्यपालांना देण्यात आले. भारतीय घटनेत या कलमांचा अंतर्भाव केल्यानंतर तब्बल 38 वर्षांनी त्यांचा प्रथमच वापर केला गेला होता. अनुशेष दूर करणे आणि राज्याच्या सर्व भागांत समान विकास व्हावा याकरिता साधन सामुग्रीचे समान वाटप व्हावे, म्हणून या कलमांद्वारे राज्यापालांना विशेष अधिकार देण्यात आले आहेत. मा. राज्यपालांनी ही मंडळे 25 जून 1994 पासून स्थापन केली आहेत.

या विकास मंडळांच्या स्थापनेनंतर मा. राज्यपालांनी त्यांच्या दिनांक 8 नोव्हेंबर 1995 च्या आदेशावरून या तीनही विकास मंडळांची एकत्रित अनुशेष व निर्देशांक समिती स्थापन केली. या समितीमध्ये तीनही वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष,तज्ञ सदस्य, मंडळाचे सदस्य सचिव, मा. राज्यपालांचे सचिव यांचा समावेश आहे. या समितीने राज्याच्या निरनिराळया भागातील विकासाच्या असमतोलाचा अभ्यास करून, विकासाच्या प्रत्येक घटकामागील किंमती लक्षात घेऊन, नव्याने अनुशेष निश्चित केला. याबाबतचा अहवाल समितीने, मा. राज्यपालांना दिनांक 11 जुलै 1997 रोजी सादर केला.

सदर अहवालाला शासनाने मार्च 2000 मध्ये तत्वतः मान्यता दिली. त्यानुसार निर्देशांक व अनुशेष समितीने एकूण 15,355.77 कोटी रूपयांचा अनुशेष निश्चित केला होता. समितीने असेही निर्दशनास आणून दिले की, 1984 ते 1994 दरम्यान विभागवार विषमतेची दरी वाढतच गेली. विदर्भ व मराठवाडयात तो अनुक्रमे 28 आणि 29 टक्क्याने वाढला. पण उर्वरित महाराष्ट्रात मात्र त्यात 33% घसरण झाली. असेही निदर्शनास आले की, विदर्भ आणि मराठवाडयातील अनुशेष हा पायाभूत सुविधा क्षेत्रात आहे. तर राज्याच्या

उर्वरित भागात तो त्याच सामाजिक क्षेत्रातील सुविधांबाबत आहे. निर्देशांक आणि अनुशेष समितीने दर्शविलेल्या भौतिक अनुशेषाच्या संदर्भात पाटबंधारे, आरोग्य, तंत्रशिक्षण, पाणीपुरवठा, रस्ते, भूविकास व फलोत्पादन या विभागांनी मतभिन्नता दर्शविल्याने निर्देशांक व अनुशेष समितीकडून, त्याचे पूनर्विलोकन करून घेण्यात आले. त्यानुसार दिनांक 31 मार्च 1994 रोजीचा अनुशेष 14,006.77कोटी रूपयांचा असा अंतिमतः निर्धारीत करण्यात आला. त्याला मा. राज्यपाल महोदयांनी सुध्दा मान्यता दिली. तो अनुशेष क्षेत्रनिहाय, अभ्यासक जिल्हानिहाय दर्शविला आहे.

पूनर्गठित अनुशेष व निर्देशांक समितीने 31 मार्च 1994 रोजी दर्शविलेला, विकास क्षेत्र निहाय, अभ्यासक जिल्हयांचा अनुशेष



आलेखामध्ये दर्शविल्याप्रमाणे, निर्देशांक व अनुशेष समितीने महाराष्ट्राचा काढलेला एकूण अनुशेष 14,006.77 कोटी रूपयाचा होता. त्यातील प्रामुख्याने सिंचन क्षेत्राचा 52.96 टक्के, त्यानंतर रस्त्याचा 16.57 टक्के, आरोग्य क्षेत्राचा व पंपाचे उर्जीकरण प्रत्येकी 8.73 टक्के, मृद व जलसंधारण क्षेत्राचा 5.63 टक्के, तर शिक्षण क्षेत्राचा 5.08 टक्के इतका होता.

आलेखमध्ये दर्शविल्याप्रमाणे बुलडाणा जिल्ह्याचा एकूण अनुशेष 1012.18 कोटी रूपये होता. यामध्ये प्रामुख्याने सिंचन क्षेत्राचा 780 कोटी रूपये, 77.06 टक्के, रस्त्याचा 11.42 टक्के, शिक्षणाचा 1.62टक्के, आरोग्य क्षेत्राचा 5.18टक्के, पाणीपुरवठयाचा 0.85 टक्के, मृद व जलसंधारणाचा 3.83 टक्के इतका होता.

थोडक्यात या विश्लेषणावरून बुलडाणा जिल्ह्यांचा प्रामुख्याने रोजगारावर पर्यायाने दरडोई उत्पन्नावर परिणाम करणाऱ्या क्षेत्रांचा जसे सिंचन, रस्ते, मृद व जलसंधारण, पंपाचे उर्जीकरण या क्षेत्राचा अनुशेष मोठया प्रमाणावर होता. त्या खालोखाल आरोग्य व पाणी पुरवठा क्षेत्राचा व त्यानंतर शिक्षण क्षेत्राचा अनुशेष शिल्लक होता.

3.2.4 महाराष्ट्रातील व अभ्यासक जिल्ह्यातील अनुशेष दूर करण्याकरिता केलेला खर्च व त्याचे अनुशेषाशी प्रमाण :– राज्यातील विभागनिहाय व क्षेत्रनिहाय असलेला अनुशेष दूर करण्याकरिता सन 1985–86 पासून प्रत्येक जिल्ह्याकरिता, जिल्हा नियोजनामध्ये विशेष तरतूद केल्या जाऊ लागली आहे. त्याकरिता स्वतंत्र निधी देऊन खर्च केल्या जात आहे. महाराष्ट्रात व अभ्यासक जिल्ह्यांमध्ये अनुशेषावर झालेला खर्च व त्याचे अनुशेषाशी प्रमाण किती आहे. हे तक्ता क्र. 3.8 मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. 3.8

महाराष्ट्र व अभ्यासक जिल्ह्यातील अनुशेष दूर करण्याकरिता झालेला खर्च व त्याचे अनुशेषाशी प्रमाण

(आकडेवारी कोटीत)

वर्ष जिल्हा	1985–86 ते 2001–02 पर्यंतचा खर्च	2002–03 चा प्रत्यक्ष खर्च	2003–04 चा प्रत्यक्ष खर्च	2004–05 चा प्रत्यक्ष खर्च	2005–06 चा प्रत्यक्ष खर्च	1985–86 ते 2005–06 पर्यंतचा खर्च	अनुशेषाशी एकुण खर्चाचे प्रमाण
बुलडाणा	412.17	5.45	6.99	5.36	2.67	432.64	42.74%
महाराष्ट्र	10,270.65	267.50	269.72	184.32	874.50	11803.69	84.27%

(स्त्रोत :– महाराष्ट्र शासन (2008) – महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल – शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई पान क्र. 82)

तात्पर्य वरील विश्लेषणावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील अनुशेष दूर करण्याकरिता, महाराष्ट्राच्या एकूण अनुशेषावरील तरतूदींपैकी 84 टक्के खर्च करण्यात आला. त्याचप्रमाणे, अनुशेषावरील तरतूदीपैकी, अनुशेषग्रस्त विभागात अनुक्रमे विदर्भात 64. 05 टक्के, मराठवाडयामध्ये 68.75 टक्के खर्च झाला. उर्वरित महाराष्ट्रामध्ये 83.00 टक्कखर्च झाला. अभ्यासक जिल्ह्यांमध्ये, बुलडाणा 42.74 टक्के खर्च झाला. यावरून अनुशेष दूर करण्याकरिता प्रामाणिक प्रयत्न झालेच नाही असे म्हणावे लागेल. त्यामुळे अनुशेषाचा अनुशेष सारखा वाढतच आहे. अनुशेषामधील क्षेत्रनिहाय सिंचन, रस्ते, मृद व जलसंधारण, पंपाचे उर्जीकरण यासारख्या महत्त्वाच्या बाबींवर खर्च होत नसल्याने लोकांच्या रोजगारात वाढ होत नाही. पर्यायाने त्यांच्या उत्पन्नात वाढ होत नाही. त्यामुळे ते जीवनमानाशी निगडीत अशा शिक्षण, आरोग्य, परिवहन, दळणवळण इत्यादी बाबींवर खर्च करू शकत नाही. म्हणूनच या जिल्ह्यांचा मानव विकास कमी राहण्यास, अनुशेष हा एक महत्त्वाचा घटक प्रामुख्याने कारणीभूत आहे हे स्पष्ट होते.

3.3 तथ्य विश्लेषण :– प्रस्तुत उपप्रकरणात मुलाखत व अनुसूची या तंत्राचा उपयोग करून प्राथमिक तथ्यांचे संकलन केले आहे. त्याआधारावर जमा केलेल्या माहितीचे सारणीकरण करून त्यानंतर विश्लेषण केले आहे. तसेच गृहितकांची पडताळणी केलेली आहे.

3.3.1 प्राथमिक तथ्यांच्या सर्वेक्षणाची व आगणनाची पध्दती :– प्राथमिक तथ्यांच्या संकलनाकरिता जे सर्वेक्षण केले त्याकरिता संस्तरित नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला. सर्वेक्षणासाठी बुलडाणा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून दोन गावांची निवड केली. ज्यामध्ये एक ग्रामीण (खेडेगाव) आणि दुसरे अर्धशहरी अशा स्वरूपाचे आहे. त्या गावातील प्रतिनिधीक लाभार्थी संख्या खालीलप्रमाणे होती. 13 तालुक्यांच्या प्रत्येक दोन गावामधून म्हणजेच 26 गावांमधून प्रत्येकी 10 कुटुंबाचे अशाप्रकारे 260 लाभार्थ्याचे सर्वेक्षण केले. या निवडलेल्या प्रतिनिधीक लाभार्थ्यांमध्ये शेतकरी, व्यापारी, नौकरदार, विविध उत्पन्न गटातील नागरिक व विविध जाती–धर्मातील नागरिक इत्यादींचा प्रमाणबद्ध समावेश करण्यात आला आहे.

मानव विकासाचे अध्ययन करतांना यामध्ये प्रामुख्याने कुटुंबप्रमुखाचे वय, व्यवसाय, जात इत्यादींच्या आधारे वर्गीकरण केले. त्याचप्रमाणे कुटुंबातील संख्येनुसार लिंगभेद वर्गीकरण, आरोग्य व स्वच्छतेच्याबाबत,उपलब्ध वैद्यकीय सुविधा, पिण्याचे पाणी, शौचालयाचा वापर इत्यादी तसेच शिक्षणांच्या संदर्भात साक्षर–निरक्षरतेचे प्रमाण, शाळेचा प्रकार इत्यादीबाबत वर्गीकरण व विश्लेषण केले आहे. त्याचप्रमाणे सर्वेक्षित केलेल्या कुटुंबप्रमुखाना, विविध योजनाकरिता तरतूद व खर्च केल्या जातो काय? तसेच मानवी भांडवल वाढविण्याकरिता प्रयत्न केले जातात काय? असे प्रश्न विचारून त्याचे सुध्दा विश्लेषण केले आहे. ते पुढीलप्रमाणे.

3.3.2 गृहीतकृत्यांचे परीक्षण **(Testing of Hypothesis)** :– प्रकरण 1 मधील मुद्दा क्र. 1.5.2 मध्ये गृहीतकांची निर्मीती केली आहे. गृहीतकांची निर्मीती केल्यानंतर त्यांचे परीक्षण करणे आवश्यक आहे. अन्यथा ते केवळ अनुमान राहतील म्हणून या उपप्रकरणात गृहितकृत्यांचे परीक्षण खालीलप्रमाणे केले आहे.

1) बुलडाणा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक आणि महाराष्ट्राचा सरासरी मानव विकास निर्देशांक यामध्ये लक्षणिय फरक नाही. :– या शून्य गृहितकृत्याची संख्याशास्त्रीय सार्थकता पडताळून पाहण्याकरिता, T परीक्षणकरून, T परीक्षणाचे गणनित (प्राप्त) मूल्य आणि T परीक्षणाचे सारणी मूल्यतक्ता क्र. 3.10 मध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. 3.10

महाराष्ट्र व अभ्यासक जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकाचे

T परीक्षण **(T-Test)**

जिल्हा	मानव विकास निर्देशांक	
वर्ष	महाराष्ट्र	बुलडाणा
1991	0.513	0.474
2001	0.591	0.561
2005	0.612	0.574
T–परीक्षणाचे प्राप्त मूल्य		0.4583
df		4
T–परीक्षणाचे सारणी मूल्य		2.78

तक्ता क्र. 3.10 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र राज्याचा सरासरी मानव विकास निर्देशांक आणि बुलडाणा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांक यामध्ये लक्षणिय फरक नाही. हे पाहण्याकरिता T परिक्षण केले असता, T परीक्षणाचे गणनित (प्राप्त) मूल्य 0.4583 हे सारणी मूल्य 2.78 पेक्षा कमी आहे. स्वाधीनता मात्रा (df) 0.05 स्तरावर 4 करिता ते सार्थक नसल्याने या गृहितकृत्याचा स्विकार करावा लागेल.

2) शासनाकडून या जिल्ह्यांच्या विकासाकरिता पुरेश्या निधीची तरतूद केली जाते व ती खर्च केली जाते.

तक्ता क्र. 3.11

जिल्ह्याकरिता शासनाकडून निधी व खर्च केल्या जातो या अभिप्रायानुसार वर्गीकरण

अ क्र	निधी व खर्च यावरील अभिप्राय	बुलडाणा	
		कुटुंबाची संख्या	प्रतिशत प्रमाण
1	होय	99	38.08
2	नाही	161	61.92
	एकूण	260	100
	x^2 चे प्राप्त मूल्य	14.76	
	df	1	
	x^2 चे सारणी मूल्य	3.84	

(स्त्रोत :–अभ्यासक जिल्ह्यांतील सर्वेक्षित कुटुंबांच्या प्राथमिक तथ्य संकलनातील अनुसूचीवरून)

तक्ता क्र. 3.11 मध्ये जिल्ह्याकरिता शासनाकडून निधी दिल्या जातो. व खर्च केल्या जातो असा प्रश्न सर्वेक्षित कुटुंबियांना विचारला यावर बुलडाणा जिल्ह्यातील 99 (38.08%) कुटुंबप्रमुखानी होय, तर 161 (61.95%) लोकांनी नाही असे उत्तर दिले.

यावरून अभ्यासक जिल्ह्यांकरिता निधी दिल्या जातो व खर्च होतो. यावरील अभिप्राय सांख्यिकीयदृष्टया महत्त्वाचे आहेत. याबाबतचे X^2 चाचणीचे प्राप्त मूल्य 14.76 हे सारणी मूल्य 3.84 यापेक्षा अधिक आहे. त्यामुळे या अभिप्रायवरील भिन्नता महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे उत्तरदात्यांनी दिलेल्या अभिप्रायामध्ये सार्थक अंतर आहे. यावरून हा निष्कर्ष निघतो की, जिल्ह्यांच्या विकासाकरिता आवश्यक ती तरतूद शासनाव्दारे केली जात नाही व केलेली तरतूद पूर्णपणे खर्च होत नाही.

3) बुलडाणा जिल्ह्यातील भौगोलिक व नैसर्गीक संसाधनाचा उपलब्ध स्त्रोत लक्षात घेवून मानवी भांडवल वाढविण्याचा प्रयत्न करण्याकरिता योजना राबविण्यात आलेल्या आहेत.

तक्ता क्र. 3.12

जिल्ह्यांमध्ये मानवी भांडवल वाढविण्याकरिता शासनाच्या माध्यमातून योजना राबविल्या जातात या अभिप्रायानुसार वर्गीकरण

अ. क्र.	अभिप्राय	बुलडाणा	
		कुटुंबाची संख्या	प्रतिशत प्रमाण
1	होय	25	09.62
2	नाही	235	90.38
	एकूण	260	100
	X^2 चे प्राप्त मूल्य	169.60	
	df	1	
	X^2 चे सारणी मूल्य	3.84	

(स्त्रोत :–अभ्यासक जिल्ह्यांतील सर्वेक्षित कुटुंबांच्या प्राथमिक तथ्य संकलनातील अनुसूचीवरून)

अभ्यासक जिल्ह्यामधील सर्वेक्षित कुंटुंबाना, शासनाकडून या जिल्ह्यामध्ये मानवी भांडवल वाढविण्याकरिता योजनां राबविल्या जातात काय? यासंदर्भात पर्यटन स्थळ, स्थानिक रोजगार, उद्योग असे उदाहरणादाखल प्रश्न विचारले. बुलडाणा जिल्ह्यातील 25(9.62%) कुटुंबाने होय, तर 235(90.38%) कुटुंबांनी नाही असे उत्तर दिले.

यावरून या प्रश्नाच्या अभिप्रायाबाबत भिन्नता आहे. ती सांख्यिकीयदृष्टया महत्त्वाची असून याबाबतच्या X^2 चाचणीचे प्राप्त मूल्य, बुलडाणा जिल्ह्याचे 169.60 हे सारणी मूल्य 3.84 पेक्षा जास्त आहे. म्हणून या अभिप्रायावरील भिन्नता महत्त्वपूर्ण आहे. तक्ता क्र. 3.12 मध्ये दर्शविल्याप्रमाणे या गृहीतकाची पडताळणी करण्याकरिता X^2 चे परीक्षण केले. त्यानुसार बुलडाणा जिल्ह्याच्या X^2 चाचणीचे गणनित (प्राप्त) मूल्य169.60,हे सारणी मूल्य 3.84 पेक्षा अधिक आहे. त्यामुळे उत्तरदात्यांनी दिलेल्या अभिप्रायामध्ये सार्थक अंतर आहे. यावरून असे दिसून येते की, शासनाव्दारा अशाप्रकारच्या योजनाबाबत, पाहिजे त्या प्रमाणात अंमलबजावणी झालेली नाही.

4) बुलडाणा जिल्ह्याचा अनुशेष आणि मानव विकास निर्देशांक यांचा सहसंबंध आहे. :–

या गृहितकाची संख्याशास्त्रीय सार्थकता पडताळून पाहण्याकरिता Correlation या तंत्राचा उपयोग केला. या संदर्भात केलेले परीक्षण तक्त्यामध्ये दर्शविले आहे.

तक्ता क्र. 3.13

बुलडाणा जिल्ह्याचा अनुशेष व मानव विकास निर्देशांक यांचा सहसंबंध

जिल्हा / वर्ष	बुलडाणा	
	अनुशेष (कोटी रूपयात)	मानव विकास निर्देशांक
1991	1012.18	0.474
2001	600.01	0.561
2005	582.21	0.574
r	−0.9965	

आलेख क्र. 9.6

बुलडाणा जिल्ह्याचा अनुशेष व मानव विकास निर्देशांक यांचा सहसंबंध



उपरोक्त तक्ता व आलेखामध्ये बुलडाणा जिल्ह्याचा अनुशेष आणि मानव विकास निर्देशांक यांचा सहसंबंध दर्शविला आहे. यांचा सहसंबंध गुणक हा −0.9965 आहे. शासनाकडून अनुशेष या लेखाशीर्षाखाली विविध योजनांवर खर्च झाल्याने, अनुशेषाच्या रक्कमेमध्ये घट झाली. पर्यायाने अभ्यासक जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकांत वाढ झाली आहे. म्हणून दोघांमध्ये उच्चस्तरीय ऋणात्मक सहसंबंध आहे.

सारांशतः प्रस्तुत प्रकरणात केलेले मानव विकासाचे आगणन व प्राथमिक तथ्यांचे विश्लेषण आणि गृहितकांची पडताळणी यांच्या आधारे निष्कर्ष काढणे सोपे झाले. निष्कर्षांची आणि उपाययोजनांची चर्चा पुढील प्रकरणात करण्यात आली आहे.

प्रकरण –4
निष्कर्ष व उपाययोजना
(Conclusion & Remedy)

या अगोदरच्या प्रकरणांमधून मानव विकासाची संकल्पना, त्याचे महत्त्व, मानव विकास निर्देशांकाचे घटक, संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या, भारताच्या 1999 आणि महाराष्ट्राच्या 2002 च्या मानव विकास अहवालांचा आढावा घेण्यात आला आहे. महाराष्ट्र व बुलडाणा या जिल्ह्यांच्या मानव विकासाच्या घटकांचे–आरोग्य, शिक्षण, उत्पन्न निर्देशांकाचे आगणन केले आहे. तसेच त्यावरून मानव विकास निर्देशांकाची गणना करून, त्यांचा तौलनिक अभ्यासही त्यात केला आहे. त्याचप्रमाणे विविध योजना, जिल्ह्याचा अनुशेष आणि मानव विकास निर्देशांक यांच्या सहसंबंध संदर्भातील सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. मानव विकासाच्या संदर्भात गृहितके मांडून त्यांची पडताळणी देखील केली आहे. आवश्यक ती आकडेवारी, माहिती, तक्ते, आराखडे, आलेख, सांख्यिकीय तंत्रसाधने इत्यादींच्या माध्यमातून तौलनिक विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व मंथनातून प्राप्त झालेले नवनीत (निष्कर्ष) या अध्ययनाच्या आधारे काढले आहे. महत्त्वाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत. सोबतच काही उपाययोजनाही सुचविल्या आहेत.

1.बुलडाणा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक हा महाराष्ट्र राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे :–

महाराष्ट्र आणि बुलडाणा जिल्हा यांच्या मानव विकास निर्देशांकाचे आगणन केले असता, महाराष्ट्राचा मानव विकास निर्देशांक. 1991 यावर्षी 0.513, सन 2001 मध्ये 0.591 आणि सन 2011 मध्ये 0.655 इतका होता. तर बुलडाणा जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक अनुक्रमे 0.474, 0.561 व 0.617 इतका होता. तो राज्याच्या सरासरीपेक्षा 0.039, 0.030 व 0.038 अंकांनी कमी होता.

याचाच अर्थ अभ्यासक जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक, राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे. अभ्यासक जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांक वाढीची स्थिती पाहिली असता, सन 1991 ते 2001 या कालखंडात राज्याच्या सरासरीच्यापेक्षा ती जास्त होती. परंतु, सन 2001 ते 2005 या कालखंडातील वाढ मात्र राज्याच्या सरासरीपेक्षा कमी आहे. अभ्यासक जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होण्याकरिता मानव विकासाचे जे घटक आहेत त्यात वाढ होणे गरजेचे आहे. जसे उत्पन्नातील वाढ आणि मानव विकास निर्देशांक यांचा निकटचा संबंध आहे. त्यामुळे बुलडाणा जिल्ह्यांच्या व्दितीय क्षेत्रात म्हणजेच उद्योगातील रोजगारात वाढ होणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे, तर या अभ्यासक जिल्ह्यांच्या कृषी क्षेत्राच्या रोजगाराची मूळ रचना बदलविणे गरजेचे आहे. कृषी क्षेत्रावर आधारित

उद्योगांची उभारणी, पूरक व्यवसायास मदत अशा सर्व क्षेत्रांमध्ये आर्थिक विकास होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आरोग्य व शिक्षण यासारख्या पायाभूत सुविधांकडे जास्त लक्ष द्यावे लागेल. जेणेकरुन आरोग्य व शिक्षण निर्देशांकामध्ये सुधारणा होईल. त्याकरिता आरोग्यविषयक सोयी–सुविधा, शाळा, महाविद्यालये ही सर्वांना सहज उपलब्ध झाली पाहिजे, तसेच त्यांचा पूर्ण क्षमतेने वापर झाला पाहिजे.

2. स्त्री–पुरुषांचे घटते प्रमाण एक गंभीर समस्या :–

स्त्री–पुरुषांचे वाढते व्यस्त प्रमाण ही एक गंभीर समस्या आहे. राष्ट्रीय लिंग गुणोत्तरापेक्षा महाराष्ट्रातील प्रमाण कमी आहे. महाराष्ट्रात स्त्री–पुरुषांचे प्रमाण सन 1991 मध्ये दर हजारी 934, तर सन 2001 मध्ये ते 922 पर्यंत घसरले होते. अभ्यासक जिल्ह्यातील बुलडाणा जिल्ह्यात तर ही समस्या अधिकच तीव्र स्वरुपाची आहे. बुलडाणा जिल्ह्यात हे प्रमाण 1991 मध्ये 953, तर 2001 मध्ये 946 इतके होते. प्राथमिक तथ्य संकलनामध्ये केले असता हे प्रमाण 860 च्या जवळपास आढळून आले. सद्यस्थितीत बुलडाणा जिल्हा हा व्यस्त प्रमाणाच्या बाबतीत राज्यातून तिसऱ्या क्रमांकावर आहे. ही अतिशय चिंतनीय स्थिती आहे.

राज्यातील व अभ्यासक जिल्ह्यातील घटते स्त्री–पुरुषांचे प्रमाण ही चिंतनीय तसेच गंभीर समस्या आहे. याकरिता शासनाने, स्वंयसेवी संस्थाच्या माध्यमातून व्यापक प्रमाणावर जनजागृती करावी. तसेच हे गुणोत्तर कमी होण्याकरिता गर्भपात, गर्भलिंग तपासणी करणाऱ्या दवाखान्यावर, डॉक्टर्स व दांपत्यावर कायदेशीर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. 'लेक–लाडकी' या अभियानाची व्यापक प्रसिद्धी करण्याची गरज आहे. त्याच प्रमाणे ज्या पालकांना एकच मुलगी आहे त्यांना विशेष आर्थिक मदत, शिक्षण व इतर योजनांमध्ये सवलती देणे गरजेचे आहे.

3. कुटुंब नियोजन कार्यक्रमाचे अपयश :–

कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश लोकसंख्या स्थिर करणे व लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे हा आहे. या कार्यक्रमातंर्गत नसबंदी, दोन मुलांमधील अंतर ठेवण्याकरिता तांबी, इन्ट्रायुटेरीन साधने इत्यादी उपाय लोकसंख्या नियंत्रणाकरिता केले जातात. एकूणच हे उपाय अंमलात आणणाऱ्यांची संख्या, प्रमाण हे उद्दिष्टांच्या प्रमाणात कमी आहे. महाराष्ट्रात लक्ष्य होते 4,50,000, साध्य 3,63,700 इतके झाले त्याचे प्रमाण 81 टक्के इतके आहे. तर बुलडाणा जिल्ह्याचे प्रमाण 56.20 टक्के होते. नसबंदी शस्त्रक्रियांच्या संख्या वाढल्याने प्रजनन दर कमी होत नाही. ती कोणत्या वयात व किती अपत्यांनंतर केली जाते याला महत्त्व आहे. लोकसंख्या वाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार कितीही प्रयत्न करीत असले तरी अनेक सामाजिक चालीरीतींमुळे हे प्रयत्न कमी पडत आहेत. यावर मात करण्याकरिता यश मिळाले तरच प्रजनन दर कमी होईल. जन्मदर कमी न होणे,

किशोर वयातील अपत्य संभव, मुलगाच हवा, नसबंदी करणाऱ्या डॉक्टरांचा जिल्ह्यात अभाव, मासिक, त्रैमासिक शिबिरांचे आयोजन करताना नियोजनाचा, साहित्याचा अभाव हे या मार्गातील अडथळे आहेत.

लोकसंख्या स्थिर करण्याकरिता विवाहासाठी किमान वय कायद्याची काटेकोर अमंलबजावणी, तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या संदर्भात गरज आहे ती समाजप्रबोधनाची. शासनस्तरावर, सामाजिक व स्वंयसेवी संघटनांच्या माध्यमातून लोकसंख्या नियंत्रणाची गरज, फायदे, एकूण अर्थव्यवस्थेवर होणारा त्याचा परिणाम यासंबंधात व्याख्यानमालांचे आयोजन, परिसंवाद, चर्चासत्र, वेळ पडल्यास शिबिरे, विविध महाविद्यालयांतील राष्ट्रीय छात्र सेवा योजनामधील विद्यार्थ्यांची पथनाटये घेऊन प्रबोधन करण्याची गरज आहे.

4. जन्मदर, मृत्यूदर आणि बालमृत्यूदराबाबत विविध विभागांमध्ये समन्वयाचा अभाव :— विकासाच्या प्रक्रियेत असलेल्या कोणत्याही देशात किंवा राज्यात वाढती लोकसंख्या ही मोठी समस्या असते. त्यामुळेच जन्मदर, मृत्यूदर, बालमृत्यूदर यांच्या प्रमाणांना विशेष महत्त्व असते. विकसनशील समाजात सर्वप्रथम मृत्यूदर कमी होतो आणि त्यानंतर प्रजनन दर हा मंदावत असतो. राज्य सरकारने लोकसंख्या धोरण 2001 मध्ये जाहीर केले. त्यानुसार राज्यात सन 2005 मध्ये दर हजारी जन्मदर 19, मृत्यूदर 6.7, तर बालमृत्यू दर 36 इतका होता. बुलडाणा जिल्ह्यात हेच प्रमाण अनुक्रमे दर हजारी जन्मदर 20, मृत्यूदर 6.5, तर बालमृत्यूदर 34 इतका होता.

आकडेवारी संकलित करणारे आरोग्य संचालनालय, सांख्यिकी विभाग हा विषय किती गांभीर्याने घेत असतो, हे यावरून लक्षात येते. त्याचप्रमाणे निरीक्षणावरून असेही लक्षात आले की, जन्ममृत्यू व बालमृत्यूची नोंदणी करणारा विभाग म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था, अहवाल देणारी संस्था आरोग्य विभाग, जिल्हा परिषद व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय यांच्यामध्ये समन्वयाचा अभाव आहे.

प्रजनन दर, मृत्यूदर कमी करण्याकरिता बालमृत्यू दरामध्ये घट करण्याकरिता, त्याचप्रमाणे राज्यशासनाने यासंदर्भात दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता जिल्हास्तरावर एक संनियंत्रण कक्ष असावा. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्था, आरोग्य विभाग व एकात्मिकबाल विकास सेवा योजना या कार्यालयांमध्ये या माहितीच्या संदर्भात समन्वय साधला जावा. त्या माहितीची संनियंत्रण कक्षामध्ये पडताळणी करावी. तसेच जन्मदर, मृत्यूदर, बालमृत्यूदरात घट करण्याकरिता, नोंदणी करण्याकरिता व जनतेपर्यंत हा विषय पोहचविण्याच्या दृष्टीने व्यापक अभियान उभारणे गरजेचे आहे. याकरिता स्वयंसेवी संस्थांची मदत, स्थानिक स्वराज्य संस्थांचे संगणकीकरण, त्या माध्यमातून अहवाल सादर करण्याची व्यवस्था इत्यादी उपायोजना करण्याची नितांत गरज आहे.

5. वैद्यकीय सुविधांचा अभाव :– मानव विकास मोजण्याच्या मापदंडातील आयुर्मान हा एक महत्त्वाचा मापदंड आहे. कोणत्याही राज्यातील लोकांचे आयुर्मान हे ज्या विविध घटकांवर अवलंबून असते. राज्यातील व अभ्यासक जिल्ह्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधांची आकडेवारी पाहिल्यास राज्यात 2005 मध्ये प्रतिलाख लोकसंख्येमागे दवाखान्यांची संख्या 1.08, तर रुग्णालयांची संख्या 2.14, प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या 1.87, तर खाटांची संख्या 100 इतकी होती. अभ्यासक जिल्ह्यांतील बुलडाणा जिल्ह्यात ही संख्या प्रतिलाख लोकसंख्येमागे दवाखान्यांची संख्या 3.13, रुग्णालयांची 0.90, प्राथमिक आरोग्य केंद्रांची संख्या 2.32 व खाटांची संख्या केवळ 58 इतकी होती.

महाराष्ट्रामध्ये ग्रामीण व दुर्गम भागात दवाखान्यांची संख्या कमी आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्र ग्रामीण भागातच असतात. त्यामुळे महाराष्ट्रातील हे प्रमाण या अभ्यासक जिल्ह्यांपेक्षा कमी दिसते. परंतु रुग्णालये आणि वैद्यकीय संस्थांमधील प्रति लाख लोकसंख्येमागे असलेली खाटांची सरासरी संख्या ही अभ्यासक जिल्ह्यांपेक्षा महाराष्ट्रात जास्त दिसते. याचे कारण राज्यातील मोठ्या व मध्यम शहरांमध्ये रुग्णालये व खाटांच्या संख्येचे प्रमाण जास्त आहे. म्हणजे शहरांमध्ये त्यांचे केंद्रीकरण झालेले आहे. ग्रामीण भागांना आरोग्य सुविधांपासून काही प्रमाणात वंचित ठेवण्यात आले आहे. तेथील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे जरी लोकसंख्येच्या प्रमाणात असली तरी तिथे अद्ययावत वैद्यकीय उपकरणे, साधन सुविधा, उपलब्ध नाहीत. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बऱ्याच जागा रिक्त आहेत. याचा ग्रामीण भागातील म्हणजेच अभ्यासक जिल्ह्यातील जनतेच्या आयुर्मानावर निश्चितच परिणाम होतो.

अभ्यासक जिल्ह्यातील तसेच राज्याच्या ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून राज्याच्या ढोबळ उत्पन्नापैकी 5 टक्के निधी या सोयी–सुविधांवर खर्च व्हावा. खाजगी आरोग्य व्यवस्थेला आचारसंहिता लागू व्हावी. ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना कमी दरामध्ये सेवा देण्याचे बंधन त्यांना लावण्यात यावे. धर्मादाय ट्रस्टची रुग्णालये ग्रामीण तसेच अभ्यासक जिल्ह्यांच्या मध्यवर्ती ठिकाणी उभारण्याकरिता त्यांना शासनाकडून विविध सवलती देण्यात याव्यात. अशा उपाययोजना अंमलात आणता येतील.

6.लसीकरण व आरोग्य तपासणीचे कार्य उद्दिष्टपूर्ती इतके नाही :– बालमृत्यूदर, अर्भक मृत्यूदर व माता मृत्यूदर कमी करण्यासाठी लसीकरण व आरोग्य तपासणी ही राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान या कार्यक्रमातंर्गत केली जाते. ग्रामीण आणि अतिदुर्गम भागांतील गरीब कुटुंबांना परवडण्यायोग्य व दर्जात्मक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या अभियानाची सुरुवात झालेली आहे. या कार्यक्रमातंर्गत बीसीजी, ट्रिपल, क्षय व गोवर प्रतिबंधक, धनुर्वात इ. लसीकरण केले जाते व पोलिओचे डोज् दिले

जातात. याबाबत अद्याप 100 टक्के लक्ष अजूनही साध्य झालेले नाही. या संदर्भात अभ्यासक जिल्ह्यातील सर्वेक्षित कुटुंबांना दोन प्रश्न विचारण्यात आले. 1) कुटुंबांतील बालकांचे लसीकरण झाले आहे काय? 2) आरोग्यसेवक नियमित भेटी देऊन आरोग्य तपासणी करतात काय? तर लसीकरणाच्या बाबतचे प्रमाण बुलडाणा जिल्ह्यात 98 टक्के दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात 88 ते 89 टक्के लोकांनी होय असे उत्तर दिले.

लसीकरण व आरोग्य तपासणीचे लक्ष्य 100 टक्के साध्य करावयाचे असल्यास लसीकरणाच्या कार्यक्रमाची अधिक प्रसिद्धी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक अंगणवाडी, प्रत्येक खाजगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांमधून डॉक्टरांनी तसेच बिटमधील प्रत्येक गावांना आरोग्य सेवकांनी भेटी देऊन आरोग्य तपासणी 100 टक्के करणे अपेक्षित आहे.

7.एकात्मिक बाल विकास प्रकल्पांच्या गुणात्मक कार्यात वाढ होणे गरजेचे :— एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या अतंर्गत गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता, आणि सहा वर्षांखालील बालकांचे आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्याकरिता सेवा पुरविल्या जातात. जसे, आरोग्य तपासणी, लसीकरण, पूरक—पोषण आहार, संदर्भसेवा, आणि शालेय पूर्व शिक्षण इत्यादी. बालकांच्या वय, उंची आणि वयानुसार त्यांचा पोषण दर्जा कसा आहे, हे समजते. पोषणातील कमतरतेने आरोग्यावर दूरगामी परिणाम होतात. त्यामुळे वाढ खुंटणे, रोगसंसर्ग आणि अपमृत्यू होऊ शकतात. अशाप्रकारे कुषोपण होऊ नये म्हणून बालकांचे श्रेणीयन केले जाते. श्रेणी 3 व 4 मधील बालकांची विशेष काळजी घेतली जाते. एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या कार्याचा आढावा घेण्याकरिता खेडयांमधील अंगणवाडयांचा निरीक्षण केले असता, प्रत्येक अंगणवाडीला स्वतंत्र इमारत होती. परंतु, जवळपास 80 टक्के अंगणवाडयांमध्ये बालकांचे वजन घेण्याकरिता वजन काटे, झोळणी, ग्रोथ चार्ट उपलब्ध नव्हते. अंगणवाडी पर्यवेक्षिका या श्रेणी 3 व 4 च्या बालकांची संख्या अंदाजे प्रकल्पामध्ये कळवितात, असे दिसून आले. पोषण आहारामध्येही खंड पडल्याची स्थिती असते. यावरून अंगणवाडीच्या संदर्भात संख्यात्मक काम झाल्याचे दिसते, गुणात्मक नव्हे.

एकात्मिक बाल विकास प्रकल्पाच्या कामकाजात गुणात्मक वाढ होण्याकरिता प्रकल्प अधिकाऱ्यांनी प्रत्येक अंगणवाडीला किमान 3 महिन्यातून एक भेट देणे, पर्यवेक्षिकेने महिन्यातून किमान एक भेट देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक अंगणवाडीला वजन काटे, ग्रोथ चार्ट, सातत्याने पोषण आहार पुरविणे बंधनकारक आहे. लसीकरण व आरोग्य तपासणी 100 टक्के झाली आहे काय? याचे संनियंत्रण स्वतः उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) जिल्हा परिषद यांनी समन्वय सभा घेऊन करणे गरजेचे आहे.

8. शौचालयांचा वापर 100 टक्के होणे आणि स्वच्छतेच्याबाबत जाणीव जागृती करणे आवश्यक :— सार्वजनिक स्वच्छतेच्या दृष्टीने, तसेच शौचालयाच्या वापराला

प्रोत्साहन मिळण्याकरिता राज्य शासन ग्रामीण भागात संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान राबवीत आहे. या अनुषंगाने अभ्यासक जिल्ह्यातील सर्वेक्षित कुटुंबांना शौचालयाच्या वापराबाबत प्रश्न विचारला असता बुलडाणा जिल्ह्यातील 260 कुटुंबांपैकी 58टक्के लोकांनी होय, तर 42 टक्के लोकांनी नाही, असे उत्तर दिले. वैयक्तिक स्वच्छतेच्याबाबत प्रश्न विचारले असता, बुलडाणा जिल्ह्यातील 96 टक्के, लोक वैयक्तिक स्वच्छता करतात. या विवेचनानुसार, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून शौचालयाचा 100 टक्के वापर होणे आवश्यक आहे. याकरिता ग्रामीण भागातील जनतेमध्ये जनजागृती होण्यासाठी, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये, विद्यार्थी, जागरूक जनता यांच्या माध्यमातून व्यापक अभियान घेणे, स्वच्छतेचा संदेश व फायदे पोहचविणे आवश्यक आहे.

9. आयुर्मानाच्या निर्देशांकात वाढ होणे गरजेचे आहे :— मानव विकासाच्या मापदंडांपैकी एक आयुर्मानाचा निर्देशांक आहे. व्यक्तीचे आयुर्मान हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. जसे, त्या जिल्ह्यातील जन्मदर, मृत्यूदर, उपलब्ध वैद्यकीय सुविधा, लसीकरण, आरोग्य तपासणी, शुद्ध पिण्याचे पाणी इत्यादी. या आयुर्मानाच्या अंकावर हा निर्देशांक काढला जातो. अभ्यासक जिल्ह्याच्या आयुर्मानाचा हा निर्देशांक महाराष्ट्र राज्याच्या सरासरी निर्देशांकापेक्षा कमी आहे.

अभ्यासक जिल्ह्यांचा हा निर्देशांक कमी असण्याची अनेक कारणे आहेत. यापैकी महत्त्वाचे म्हणजे शहरी आणि ग्रामीण भागात असणारी तफावत त्याचप्रमाणे शहरी भागात आरोग्य सेवेवर होणारा लोकांचा खर्च हा वाढता आहे. परंतु त्या वैद्यकीय सेवांचा दर्जा मात्र दर्जेदार व समाधानकारक नाही. याउलट ग्रामीण भागांत आरोग्य सोयी सुविध ा या अत्यंत अपुऱ्या आहेत. शासनाच्या आरोग्यविषयक अभियानामुळे लोकांच्या आरोग्य विषयक स्थितीमध्ये बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे. परंतु, 70 टक्क्यांपेक्षा अधिक अत्याधुनिक, सुसज्ज अशी रुग्णालये आजही शहरी भागात केंद्रित झालेली आहेत; तर 70 टक्के जनता ही खेड्यातच वास्तव्य करून आहे, ही वास्तविकता आहे. अजूनही काही ग्रामीण व दुर्गम भागातील लोकांना आपआपल्या वस्त्यांपासून किंवा कामाच्या ठिकाणांपासून अगदी प्राथमिक सेवा उपलब्ध होण्यासाठी बरेच अंतर जावे लागते, त्यामुळे ते आरोग्यसेवेपासून वंचित राहतात. जवळपास 70 ते 80 टक्के डॉक्टर्स व औषोधोपचारांच्या सोयी या खाजगी व्यक्ती किंवा संस्थांच्या ताब्यात आहेत. त्यावर शासकीय यंत्रणांचे फारसे नियंत्रण नाही. या जिल्ह्याविषयी शासनाची आरोग्यविषयक अनास्थाच दिसून येते. बुलडाणा जिल्ह्यात एकही वैद्यकीय महाविद्यालय नाही किंवा एकही सुपर स्पेशालिटी रुग्णालय नाही. या जिल्ह्यामधील जनतेला मोठ्या आजारासाठी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद येथे जावे लागते. त्यासाठी प्रचंड पैसाही खर्च करावा लागतो. तसेच जिल्ह्यांतर्गत सुद्धा साधारण वैद्यकीय सोयीसुविधा या जिल्ह्यांच्या ठिकाणी केंद्रित झालेल्या दिसून येतात.

आयुर्मानाचा निर्देशांक वाढविण्याकरिता भारतीय राज्यघटनेत आरोग्याला मूलभूत हक्काचे स्थान जोपर्यंत मिळत नाही, तोपर्यंत जनतेला माफक दरात पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य सुविधा, शल्यचिकित्सा प्राप्त होणार नाहीत. तसेच राज्य शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात आरोग्य खर्चावर विशेष भर देऊन ज्या जिल्ह्याचा मानव विकास कमी आहे, त्या ठिकाणी आरोग्य योजनांवर अधिक खर्च करावा. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या निधीमधून प्रत्येक जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी सर्व सोयी–सुविधायुक्त अशा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची निर्मिती करणे आवश्यक आहे.

10. निरक्षरतेचे प्रमाण जास्त :– मानव विकासाचा दुसरा मापदंड ज्ञान (शिक्षण) हा आहे. शिक्षण ही आर्थिक, सामाजिक प्रगतीकडे नेणारी प्रक्रिया आहे; तसेच ती मानव सक्षमीकरणाची सुद्धा प्रक्रिया आहे. मानवी भांडवलाच्या उभारणीत शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे, म्हणून साक्षरतेला महत्त्व आहे. सन 2001 मध्ये महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण 76.88 टक्के इतके होते. तर बुलडाणा जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण 75.78 टक्के इतके होते,हे प्रमाण महाराष्ट्र राज्याच्या सरासरी साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा अभ्यासक कमी आहे.

अभ्यासक जिल्ह्यांमधील निरक्षरतेचे प्रमाण कमी करण्याकरिता एकही शाळाबाह्य मूल राहणार नाही याची दक्षता शिक्षण विभागाने घेतली पाहिजे. तसेच, विविध कारणामुळे शैक्षणिक गळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर आहे. शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी करण्याकरिता नवनवीन कल्पना शिक्षण विभागाने राबवाव्यात, त्याचप्रमाणे प्रौढ शिक्षण (निरंतर शिक्षण) कार्यक्रम हा सध्या स्थगित करण्यात आलेला आहे. या विभागासमोर प्रौढ शिक्षणाकरिता अद्याप कोणतीही योजना अस्तित्त्वात नाही. तरी स्वयंसेवी संस्था व बचत गटांच्या माध्यमातून, कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून (त्या विद्यार्थ्यांना विशिष्ट गुणदान करून) प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविण्यात येऊन 100 टक्के साक्षरता साध्य करावी.

11. शैक्षणिक गळतीचे प्रमाण अभ्यासक जिल्ह्यांमध्ये जास्त :– शिक्षण हा मानवी विकासाचा केंद्रबिंदू आहे. देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा दर दाखविणारा तो मानदंड आहे. संयुक्त राष्ट्र संघाने 2015 पर्यंत जगामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट ठेवले आहे. म्हणून भारत सरकारने मोफत व सवलतीच्या प्राथमिक शिक्षणासाठी 13,100 कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. अलीकडील काळात आर्थिक वाढीच्या बरोबर, जन्मदर, साक्षरता दर यांचा संबंध शिक्षणाशी जोडला जात आहे. निरक्षर जनता ही देशाच्या विकासातील अडथळा मानला जात आहे. म्हणून शाळाबाह्य मुले आणि शालेय शिक्षणातील गळतीचे प्रमाण यावर विशेष भर दिला जात आहेराज्यातील गळतीच्या प्रमाणाची तुलना बुलडाणा जिल्ह्यांशी केल्यास गळतीचे प्रमाण जास्त आहे.

शालेय शिक्षणातील गळतीचे प्रमाण कमी करण्याकरिता अथवा एखादा कालखंड निश्चित करून 0 (शून्य) पर्यंत आणण्यासाठी, मुलांची शिक्षणाविषयीची उदासीनता घालवावी लागेल. याकरिता "हसत खेळत शिका" विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयानुसार शिक्षण इत्यादी पद्धती उपयोगात आणता येतील. विद्यार्थ्यांच्या पालकांची शिक्षणाविषयीची अनास्था किंवा मागास दृष्टिकोन घालविण्याकरिता त्याचे उद्‌बोधन करणे, घरातील वातावरण शिक्षणास पोषक करणे, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील विद्यार्थ्यांना हंगामाच्या काळात शाळेत उपस्थित राहिल्याबद्दल उपस्थिती भत्ता देणे इत्यादी उपायोजना करता येतील.

12. अभ्यासक जिल्ह्यांच्या साक्षरता / शैक्षणिक निर्देशांकात वाढ होणे गरजेचे :– मानव विकास मापनाच्या तीन मापदंडांपैकी दुसरा मापदंड साक्षरता किंवा शैक्षणिक निर्देशांक होय. साक्षरतेत किती प्रगती झाली, हे मोजण्यासाठी साक्षरता सुधारणा निर्देशांक (IIL) काढला जातो. अभ्यासक जिल्ह्यांचा निर्देशांक हा महाराष्ट्र राज्याच्या सरासरी–पेक्षा कमी आहे. या जिल्ह्यातील शाळांमधून शैक्षणिक सोयी सुविधा या विविध योजनांमधून मोठ्या प्रमाणावर मिळत असल्या, प्रवेशाचे प्रमाण जरी वाढले असले, मूलभूत शिक्षणाचे निर्देशांक उंचावले असतील तरी गळतीचे प्रमाणही तितकेच मोठे आहे. त्याचप्रमाणे शालांत परीक्षेतील अनुत्तीर्ण होणाऱ्यांचे प्रमाण 50 टक्क्यांच्या जवळपास आहे.

बुलडाणा जिल्ह्याच्या शिक्षणाबाबतची अधिक चांगली गोष्ट म्हणजे साक्षरता / शैक्षणिक सुधारणा निर्देशांकात (IIL) झालेली वाढ होय. महाराष्ट्राचा शैक्षणिक सुधारणा निर्देशांक 0.0737 इतका, तर बुलडाणा जिल्ह्यांचा 0.0893, बुलडाणा जिल्ह्याचा साक्षरता सुधारणा निर्देशांक हा महाराष्ट्रापेक्षा जास्त दिसून आला.

अभ्यासक जिल्ह्यांच्या साक्षरता निर्देशांकामध्ये वाढ होण्याकरिता ज्याप्रमाणे सर्व शिक्षा अभियानाचा नवीन अभ्यासक्रम, नवीन पाठ्यपुस्तके, शिक्षकांचे प्रशिक्षण असे व्यापक प्रमाणावर प्रयत्न झाले. त्याचप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत स्तरावर असे प्रयत्न होणे आवश्यक आहे. याकरिता एक कालबद्ध कार्यक्रम आखण्याची गरज आहे. जेव्हा जिल्ह्यातील प्रत्येक प्रौढ साक्षर होईल आणि प्रत्येक मूल शाळेत जाईल तेव्हाच जिल्ह्यांचा, पर्यायाने महाराष्ट्राच्या मानव विकासाचा पाया अधिक मजबूत होईल.

13. जिल्हा उत्पन्नात प्राथमिक क्षेत्राच्या उत्पन्नाचा वाटा इतर क्षेत्रांच्या तुलनेत घटता :– राज्याच्या किंवा जिल्ह्याच्या उत्पन्नामध्ये विविध क्षेत्रांचा वाटा असतो. या क्षेत्रांना प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्र असे संबोधले जाते. अभ्यासक जिल्ह्यातील बुलडाणा जिल्ह्याच्या प्राथमिक क्षेत्राचा 23.94 टक्के, द्वितीय क्षेत्राचा 12.96 टक्के आणि तृतीय क्षेत्राचा 63.09 टक्के इतका होता. या जिल्ह्याची तुलना राज्याशी केल्यास अभ्यासक जिल्ह्याच्या जिल्हा उत्पन्नातील प्राथमिक क्षेत्राचा हिस्सा हा राज्याच्या उत्पन्नातील प्राथमिक हिस्यापेक्षा जास्त होता. द्वितीय क्षेत्राचा वाटा कमी असल्याने बुलडाणा जिल्ह्यांमध्ये औद्योगिकरण

अत्यंत नगण्यच आहे. त्यामुळे जिल्ह्यातीललोकांचा रोजगार हा कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. परंतु कृषी क्षेत्रात कोणतीही मोठी गुंतवणूक नसल्याने, तसेच सिंचन किंवा इतर सुविधा नसल्याने या जिल्ह्यातील प्राथमिक क्षेत्राचा उत्पन्नातील हिस्सा सातत्याने घटत आहे. त्यामुळे या जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाणसुद्धा जास्त आहे.

प्राथमिक क्षेत्रातील उत्पन्नाचा वाटा वाढविण्यासाठी आणि या क्षेत्रावरील लोकसंख्येचा भार कमी करण्याकरिता सिंचनाच्या प्रमाणात वाढ आणि कृषी क्षेत्रावर आधारित मोठ्या उद्योगांची उभारणी झाली पाहिजे. जसे साखर कारखाने, सोयाबीन व कापूस उत्पादन प्रक्रियेवर आधारित उद्योग इत्यादी, यामुळे कृषी क्षेत्रातील रोजगार द्वितीय क्षेत्राकडे स्थानांतरित होईल आणि प्राथमिक क्षेत्राच्या उत्पन्नात वाढ होईल.

14. सिंचनाचे प्रमाण अत्यल्प :— सिंचनाचे नाते हे निसर्गतःच शेती उत्पादन आणि लोकांच्या राहणीमानाशी जोडलेले असते. सिंचन, शेती उत्पादन आणि लोकांचे राहणीमान यांचा जवळचा सहसंबंध आहे. त्यामुळे राज्याला भेडसावणाऱ्या अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्नांशी हा विषय संबंधित आहे. प्रामुख्याने पश्चिम विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर होत असल्याने सिंचनाचा प्रश्न हा वैदर्भीय जनतेच्या दृष्टिकोनातून अत्यंत जिव्हाळ्याचा आहे.

महाराष्ट्रात सिंचनाचे प्रमाण सन 1961 मध्ये 6.48 टक्के इतके होते; ते सन 2005 मध्ये 18.20 टक्के इतके झाले. म्हणजेच जवळपास 12 टक्क्यांची वाढ झाली. तर बुलडाणा जिल्ह्यात हे प्रमाण सन 1961 मध्ये 1.81 टक्के इतके होते, ते सन 2005 मध्ये 5.56 टक्के इतके झाले. म्हणजेच 45 वर्षात केवळ 3.47 टक्के (तर 1991 ते 2005 या कालावधीत फक्त 0.28 टक्के) सिंचनात वाढ झाली. यावरून स्पष्ट होते की, पश्चिम विदर्भातील सिंचनाचे प्रमाण राज्याच्या सरासरी प्रमाणापेक्षा तीन ते चार पटीने कमी होते. या जिल्ह्यातील बहुतांश लोकसंख्या कृषी क्षेत्रावरच अवलंबून आहे. येथिल सिंचनाचे प्रमाण कमी असल्याने रब्बी हंगमामधील पिके येत नाही. त्यामुळे पाऊस कमी किंवा जास्त पडल्यास नापिकी होते. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होऊन कर्जबाजारीपणा वाढतो. म्हणून या जिल्ह्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. त्याचप्रमाणे दांडेकर व निर्देशांक आणि अनुशेष समितीने विदर्भाच्या सिंचनाचा जो अनुशेष काढला आहे. तो 4 हजार 421 कोटी रुपयांचा आहे. तो राज्याच्या एकूण अनुशेषाच्या 50.42 टक्के इतका होता.

सिंचनाच्या अनुशेषामुळे या जिल्ह्यातील सिंचनाचे प्रमाण अत्यल्प आहे. सिंचन क्षेत्राचे प्रमाण वाढविण्याकरिता राज्य शासनाने एक कालबद्ध कृती आराखडा तयार करावा. इतर अनुत्पादक योजनांवरील तरतूद व खर्चात कपात करून रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना निधी उपलब्ध करून द्यावा. जेणेकरून सिंचन प्रकल्पाचे लागतमूल्य मोठ्या प्रमाणावर वाढणार नाही व सिंचन क्षेत्रात वाढ होईल.

15. रोजगाराची स्थिती निराशाजनक :— रोजगार निर्मिती ही शासन व आर्थिक नियोजनकार यांचे लक्ष वेधून घेणाऱ्या प्रमुख प्राधान्यक्रमांपैकी एक आहे. रोजगाराच्या बाबतीत महाराष्ट्राच्या विशिष्ट भागात/शहरात उद्योगांच्या आणि सेवांच्या क्षेत्राचे केंद्रीकरण झाल्याने स्थलांतर व वाढते नागरीकरण यांबाबत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे. त्यामुळे या जिल्ह्यामध्ये क्षेत्र निहाय रोजगाराचे असंतुलन झाले आहे. जिल्ह्यातील बरीचशी लोकसंख्या ही रोजगाराच्या बाबतीत प्राथमिक क्षेत्रावर (कृषी) अवलंबून आहे. तसेच राज्यात आणि या जिल्ह्यात प्राथमिक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार शक्तीत सन 1991 ते 2001 या कालावधीत जी घट झाली, ती या क्षेत्रातील उत्पादनाच्या घटीपेक्षा कमी होती. प्राथमिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कामगार शक्तीच्या मानाने उत्पादन घटते, तर होतेच परंतु ते प्रतिकामगार एक चतुर्थांशाच्या जवळपास होते. प्राथमिक क्षेत्रात तंत्रज्ञानाचा अभाव आणि उत्पादनाच्या पातळीत घट या दोन प्रमुख घटकांमुळे विकास आणि दारिद्र्य निर्मूलन या दोन कार्यक्रमांत ग्रामीण महाराष्ट्रात आणि अभ्यासक जिल्ह्यात मोठे अडथळे निर्माण झाले. त्यामुळे गरीब व श्रीमंत ही दरी अधिकच रुंदावत चालली आहे.

अभ्यासक जिल्ह्यात प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांची (कामगार शक्ती) संख्या कमी करण्याकरिता शेतीपूरक उद्योग शासनाने सहकारी तत्त्वावर किंवा खाजगी व सरकार यांच्या सहकार्याने निर्माण करावे. जसे, दुग्धविकास, सोयाबीनवर आधारित उद्योग, कुक्कुटपालन व बकरीपालन उद्योग, इत्यादी.

16.रोजगार हमी योजनेचा रोजगारातील वाटा उल्लेखनीय :— दारिद्र्य निर्मूलन, रोजगार आणि संपत्तीची निर्मिती याबाबत केवळ देशाचेच नव्हे, तर संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेणारी महाराष्ट्र सरकारची "रोजगार हमी योजना" (रोहयो) प्रसिद्ध आहे. या योजनेच्या अंतर्गत बुलडाणा जिल्ह्यात 16.10 लाख मनुष्य दिवस निर्माण झाले. 1972 पासून महाराष्ट्रात "रोहयो" ही आगळी—वेगळी वैशिष्ट्यपूर्ण योजना कार्यक्षम पद्धतीने राबविल्यामुळे ग्रामीण भागात पायाभूत सेवा उपलब्ध करून दिल्या, त्याचबरोबर त्या भागात मिळकतीसोबत संपत्ती निर्मितीचे काम पार पाडले. तसेच ग्रामीण भागात वेतनाची सरासरी पातळी उंचावणे आणि वेतनाच्या दरातील विविध पातळ्या मोडून काढण्यास मदत करणे असे दोन हेतू साध्य झाले.

विषेशतः सन 1970 ते 1990 च्या द्विदशकात निर्माण झालेल्या रोजगारात या योजनेचा वाटा उल्लेखनीय होता. परंतु सन 1990 च्या दशकानंतर कामांचे दर वाढवून दिल्याने त्याचप्रमाणे अधिकाऱ्यांनी आणि ठेकेदारांनी मजुरांच्याऐवजी यंत्राच्या सहाय्याने कामे केल्याने या योजनेचे महत्त्व कमी झाले. तसेच या काळात बेरोजगारांच्या संख्येत ही वाढ झाल्याने कदाचित दारिद्र्य निर्मूलनाच्या कार्यक्रमांची परिणामकारकता कमी झाली असावी.

17. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची वाढती संख्या चिंताजनक :– निकृष्ट राहणीमान, मुलभूत गरजांचा अभाव, कुपोषण व निरक्षरता ही दारिद्र्याची लक्षणे असून त्याचा अंतिम परिणाम मानव विकास निम्नस्तरावर राहण्यास होतो. बुलडाणा जिल्ह्यात अनुक्रमे 41.64 टक्के होती. त्यात 2.86 टक्क्यांनी वाढ होवून सन 2002 मध्ये 44.50 टक्के इतकी झाली.

दारिद्र्य निर्मूलनाकरिता विविध योजना केंद्र, राज्य व जिल्हा परिषदेच्या सेस फंडामधून राबवूनसुद्धा या दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या वाढती आहे, ही चिंताजनक बाब आहे. दारिद्र्यरेषेखालील सर्वे हाच मुळात सदोष पद्धतीने केला जातो. सन 2002 या वर्षीचा सर्वे करताना ग्रामसेवकांची संघटना आणि तलाठ्यांची संघटना यांनी त्यावर बहिष्कार घातला होता. अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून गटविकास अधिकारी आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी हा सर्वे करून घेतला. सर्वेमध्ये जीवनमानाचा दर्जा दर्शविण्याऱ्या घटकांना 0 ते 4 गुणांकन देऊन 13 सामाजिक, आर्थिक निर्देशांक घेण्यात आले. जनता आपल्या कुटुंबाबद्दलची खोटी माहिती देऊन दारिद्र्यरेषेखालील यादीत आपल्या कुटुंबाचे नाव कसे येईल? आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा लाटता येईल?हे पाहतात. बरीचशी श्रीमंत व मध्यमवर्गीय कुटुंबे वारंवार विविध शासकीय योजनांचा लाभ घेतात. जर तलाठी या सर्वेमध्ये असते, तर कुटुंबाकडे एकूण किती जमीन आहे? आणि ग्रामसेवकांनी त्या कुटुंबाने अद्यापपर्यंत किती योजनांचा फायदा घेतला? त्याच्या नावावर स्थावर संपत्ती किती? याची अद्ययावत यादी दिल्यास गरजू व दारिद्र्यात खितपत पडलेल्या लोकांची वास्तविक सूची तयार होऊन त्यांनाच शासकीय योजनांचा लाभ दिल्यास दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची संख्या निश्चितपणे कमी होईल.

18. जिल्हा वार्षिक योजनेतील मंजूर नियतव्यय व तरतूद ही अर्थसंकल्पीत, खर्च केल्या जात नाही :– महाराष्ट्र राज्याचा आणि बुलडाणा जिल्ह्याचा योजनानिहाय खर्च व त्याचे प्रमाण अभ्यासले असता, कृषी व संलग्न योजनांवर 3 ते 4 टक्के, जलसिंचन व वीज या लेखाशीर्षावर 45 ते 60 टक्के खर्च केला जातो. प्रत्यक्षात सिंचनाच्या क्षेत्रात वाढ झालेली दिसून येत नाही. सामाजिक आणि सामूहिक सेवा या विकास शीर्षकांतर्गत, सामान्य शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आरोग्य सेवा, ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता आणि इतर अनेक उपशीर्ष आहेत. त्यावर केवळ 15 ते 20 टक्क्यांच्या आसपास खर्च केला जातो. यावरून असे लक्षात येते की, मानव विकासाचे जे मापदंड आहेत त्या विकासशीर्षावर मूळातच नियतन हे कमी ठेवले जाते व खर्चसुद्धा कमी प्रमाणात केला जातो.

त्याचप्रमाणे अभ्यासक जिल्ह्याला जितका नियतव्यय मंजूर केला जातो, तितका त्या त्या मंत्रालयीन विभागाकडून अर्थसंकल्पीत केल्या जात नाही. तसेच, त्या जिल्ह्यातील संबंधित कार्यालयांना कळविला जात नाही. त्यामुळे त्या जिल्ह्याचा निधी पूनर्विनियोजनामध्ये (Reaproperation) त्याच जिल्ह्यातील दुसऱ्या विभगाला समायोजित

करता येत नाही. तो निधी राज्य नियोजन विभागाकडून अन्य जिल्ह्याकडे स्थानांतरित केला जातो. त्यामुळे अनुशेषासारखे गंभीर प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे मंजूर नियतव्ययाला, जिल्हानिहाय वाटपाला काहीही अर्थ राहत नाही. त्याचप्रमाणे जिल्ह्यांना तरतूदसुद्धा त्या मंत्रालयीन विभागाकडून प्राप्त होत नाही. प्राप्त तरतूदीच्या 75 ते 90 टक्के इतकाच खर्च त्या विभागाकडून केला जातो.

जिल्ह्यांचा मंजूर नियतव्यय खर्च होण्याकरिता राज्य नियोजन विभागाच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करून जिल्हा नियोजन व विकास समितीला व्यापक अधिकार देण्यात यावे. नावीन्यपूर्ण योजना आखण्याकरिता स्वातंत्र्य दिले पाहिजे, आणि विशेष म्हणजे खासदार, आमदारांकरिता जो निधी दिला जातो, अशाप्रकारचा निधी देणे बंद केले पाहिजे. ग्रामसभा व जिल्हा नियोजन समिती जी विकास कामे सुचवतील त्यांचा प्राधान्यक्रम पाहून ती विकास कार्ये केली पाहिजेत.

19. योजनांच्या माध्यमातून मानवी भांडवल वाढविण्याचा प्रयत्न केला जात नाही :—

शासनाच्या विविध खात्यांच्या माध्यमातून अनेक योजना मोठ्या प्रमाणावर राबविल्या जात आहेत. बऱ्याच विभागांच्या योजना यासारख्याच आहेत. इतक्या योजना राबवून, मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करून अनेक प्रश्न जसेच्या तसे आहेत. उदा. पायाभूत सुविधाच्या बाबत रस्ते, वीज, बांधकाम, सिंचन, पिण्याचे शद्ध पाणी, तर मानवी भांडवलाच्या बाबत. बेरोजगारी, शिक्षणाच्या सुविधा, आरोग्य सुविधा, पर्यटन व पर्यावरण संरक्षण इत्यादी या संदर्भात सर्वेक्षण करताना सर्वेक्षित कुटुंबांना मानवी भांडवल वाढविण्याचा प्रयत्न केला जातो काय? असा प्रश्न विचारला असता, 90 टक्के कुटुंबांनी नाही, असे उत्तर दिले.

शासनाच्या विविध योजनांमधून मानवी भांडवल निर्माण करण्याकरिता जिल्हा नियोजन व राज्य नियोजन यांमध्ये थोडे बदल करावे लागतील. नियोजन करताना जिल्हा नियोजन व विकास समित्यांना व्यापक अधिकार व स्वातंत्र्य द्यावे लागेल. गावातील व शहरातील स्थानिकांच्या गरजा लक्षात घेऊन सूक्ष्मस्तरावर, ग्रामस्तरावर नियोजन विविध खात्यांच्या माध्यमातून केले पाहिजे. याकरिता दोन आराखडे तयार केले पाहिजेः 1) कृती आराखडा (Action Plan) 2) विकास आराखडा (Development Plan). कृती आराखड्यावर ग्रामस्थ आणि त्या पदाधिकाऱ्यांनी काम केले पाहिजे. उदा. गावातील स्वच्छता, शौचालयाचा 100 टक्के वापर, पाणी पुरवठा, कुटुंब नियोजन, आरोग्य व्यवस्था, शिक्षण व्यवस्था,तंटामुक्ती, विवाह वयोमर्यादा, कायद्याचे पालन इत्यादी आणि याला गुणानुक्रम दिला पाहिजे. त्या आधारावर ग्रामसभेने जी विकासात्मक कामे सुचविली आहेत, त्यावर जिल्हा नियोजन व विकास समितीने क्रमांक दोनमधील विकास आराखड्यानुसार विकास योजना राबविल्या पाहिजे, जेणेकरून मानवी भांडवल वाढेल.

20. अनुशेषामुळे अभ्यासक जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक कमी राहिला आहे. :— महाराष्ट्र राज्य हे प्रगत असले तरी महाराष्ट्राच्या सर्व विभागाचा व जिल्ह्यांचा सारखाच विकास झाला नाही. विकासामध्ये प्रादेशिक असमतोलपणा निर्माण झाला. हा प्रादेशिक अमतोलपणा/अनुशेष मापनासाठी दोन समित्यांची स्थापना होऊन अनुशेषाची विभागनिहाय रक्कम काढण्यात आली. त्यानुसार, विदर्भाचा एकूण अनुशेष 6624.02 कोटी रुपये होता. त्यापैकी पूर्ण विदर्भाचा 1868.32 कोटी रुपयांचा, तर पश्चिम विदर्भाचा 4755.70 कोटी रु. होता, त्याचे प्रतिशत प्रमाण अनुक्रमे 28.20 टक्के आणि 71.80 टक्के इतका होते. महाराष्ट्राच्या एकूण अनुशेषापैकी पश्चिम विदर्भाचा अनुशेष 33.95 टक्के, म्हणजेच राज्याच्या एकूण अनुशेषांपैकी 1/3 एकट्या पश्चिम विदर्भातील पाच जिल्ह्यांचा होता.

अभ्यासक जिल्ह्यांतील बुलडाणा जिल्ह्याचा एकूण अनुशेष 1,012.18 कोटी रुपये होता. त्यात प्रामुख्याने सिंचनाचा 780 कोटी रु. (77.06 टक्के), आरोग्याचा 5.18 टक्के, रस्त्याचा 11.42 टक्के, पाणी पुरवठ्याचा 0.85 टक्के, शिक्षणाचा 1.62 टक्के इतका होता

अनुशेष आणि मानव विकास निर्देशांक यांच्यामध्ये सहसंबंध आहे काय? याकरिता सांख्यिकीचे तंत्र (साधन) सहसंबंध गुणक याचे परीक्षण केले असता अनुशेष आणि अभ्यासक जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांकामध्ये सहसंबंध गुणक हा –0.9965 इतका आहे. हा गुणक अनुशेष आणि मानव विकास निर्देशांकात उच्चस्तरीय ऋणात्मक सहसबंध दर्शवितो. अनुशेषाची राशी जसजशी कमी होत गेली तसतशी मानव विकास निर्देशांकामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. यावरून हे स्पष्ट होते की, अनुशेषामुळे अभ्यासक जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक कमी राहिला आहे.

अनुशेष कमी करण्याकरिता व अभ्यासक जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होण्याकरिता राज्य शासनाने एक कालबद्ध कृतीआराखडा तयार करून मानव विकासाचे जे घटक आहेत त्यावर सर्वप्रथम खर्च करून आर्थिक व भौतिक अनुशेष लवकरात लवकर भरून काढल्यास अभ्यासक जिल्ह्यांच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होईल.

21. अभ्यासक जिल्ह्याचा दरडोई उत्पन्न निर्देशांक अत्यंत कमी :—

अभ्यासक जिल्ह्यांमधील जवळपास 75 टक्के जनता ही शेती व्यवसाय करते. त्यामुळे या तीनही जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न हे अत्यंत कमी आहे. अभ्यासक जिल्हयांची तुलना महाराष्ट्राशी केल्यास सन 2005 मध्ये राज्याचे दरडोई उत्पन्न 32,979 रुपये, तर बुलडाणा जिल्ह्याचे 18152 रुपये इतक महाराष्ट्राचा आणि अभ्यासक जिल्ह्यांचा दरडोई उत्पन्न निर्देशांक आगणित केला असता, महाराष्ट्राचा सन 1993–94 मध्ये (0. 2275)सन 2001 मध्ये (0.2635) आणि सन 2011 मध्ये (0.3271) इतका होता तर बुलडाणा जिल्ह्याचा अनुक्रमे (0.1416), (0.1901) आणि (0.2275) इतका होता.

यावरून असे स्पष्ट होते की, अभ्यासक जिल्ह्यांचा दरडोई उत्पन्न निर्देशांक हा राज्याच्या सरासरीपेक्षा अत्यंत कमी होता. अभ्यासक जिल्ह्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होण्याकरिता शासनाने प्राथमिक क्षेत्रातील (कृषी) पायाभूत गुंतवणूक वाढवावी. उदा. सिंचन, रस्ते, मृदसंधारण इत्यादी. तसेच, शेती पूरक उद्योग–धंदयांना साह्य करावे, प्रोत्साहन देण्याकरिता योजना कार्यक्षम पद्धतीने राबवाव्यात. द्वितीय क्षेत्रात (उद्योग) मोठ्या प्रमाणावर खाजगीस्तरावर गुंतवणूक होण्याकरिता सोयी, सुविधा, सवलती द्याव्यात, जेणेकरून खाजगी भांडवलदार/उद्योगपती येथे उद्योग सुरु करून अभ्यासक जिल्ह्यातील लोकांना रोजगार मिळेल व त्यांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होईल.

22 बुलडाणा जिल्ह्यामध्ये आरोग्य, शैक्षणिक आणि आर्थिक विषमता :– अभ्यासक जिल्ह्यामध्ये आर्थिक, आरोग्य आणि शैक्षणिक विषमता आहे काय? हे पाहण्यासाठी अभ्यासक जिल्ह्यातील 260 कुटुंबांचा सर्वे करण्यात आला. त्यांना मिळणाऱ्या वैद्यकीय सुविधा, उपचाराचा प्रकार, पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत, स्वच्छता इत्यादी आरोग्यविषयक आणि साक्षर व निरक्षर, शिक्षण, शाळेचा प्रकार इत्यादी शैक्षणिक विषयावर तसेच त्यांचे राहणीमान, उत्पन्न, खर्च, बचत, गुंतवणूक, घराचा प्रकार, विद्युत प्रकाशाचे साधन, व्यवसाय प्रकार, सरकारकडून घेतलेले अनुदान–सवलती या आर्थिक बाबतीत विविध प्रश्न विचारण्यात आले. प्राप्त माहितीचे विश्लेषण करून सांख्यिकीय तंत्र x^2 चे परीक्षण केले असता x^2 चाचण्यांचे गणनित (प्राप्त) मूल्य हे सारणी मूल्यापेक्षा अधिक असल्याचे दिसून आले. त्यामुळे अभ्यासक जिल्ह्यामध्ये आरोग्य, शैक्षणिक व आर्थिकविषयक विषमता आहे.

अभ्यासक जिल्ह्यामधील ही विषमता कमी करण्याकरिता शासनाच्या ज्या विविध योजना आहेत, त्या दारिद्र्यरेषेखालील गरजू व पात्र लाभार्थ्यांना लाभ कसा दिला जाईल, यासंदर्भात समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत विकास योजनाचा लाभ मिळण्याकरिता लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यांनी तसेच समाजातील प्रत्येक जागरूक घटकांनी प्रयत्न केले पाहिजेत. याकरिता एखादे विशिष्ट गाव, तालुक्याची निवड करून एखादा आदर्श नमुना (Roll Model) निर्माण केला पाहिजे.

वरील निष्कर्षांप्रमाणे उपाययोजनांची अंमलबजावणी झाल्यास, अभ्यासक जिल्ह्यामधील आरोग्यविषयक, शैक्षणिक आणि आर्थिक विषमता कमी होऊन बुलडाणा जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकात वाढ होईल, याची निश्चित खात्री वाटते.

परिशिष्ट – 'अ'

संदर्भसूची

1. Abusaleh Shariff (1999) - "India Human Development Report" Oxford University Press, Delhi.
2. Chellaiah R.J. and R.S. darshan (1999) " Income poverty and Beyond: Human Development in India" Social Science Press, New Delhi.
3. Dalal K.L (1991),"Human Development; An Indian Prespectiv UNDP Vikash Publication House PVT.LTD 576 Masjid Road Jangpura New Delhi-110014.
4. Deve Mehendra s. (2008),''Inclusive Growth in India''Oxford University Press YMCA Library Building Jaisingh road ,New Delhi-11000
5. Ghosh Madhusudan (Jul-2006),"Economic Growth and Human Devel opment in Indian States" Economic and Political Weekly.
6. Goverment of India (2001), "National Human Development Report-2001"
7. Govt of Maharashtra (1984), Report of the Fact Finding Committee on Regional Imbalance.
8. Govt. of Maharashtra (2002) " Human Development Report Maharshtra"
9. J.I.Gopal And Bhakri Suman (2005),"Human Development in India" Ane Books 4821 Parvana Bhavan, 24 Ansari Road New Delhi-110002
10. Kamdar Sangita (2007),"Economic Growth and Human Development; A Study of Maharashtra" Himalaya publishing House , Ramdoot Dr. Bhalerao marg Girgaon Mumbai-400004
11. Mahbub-Ul-Haq (1996),"Recletion on Human Development " Oxford Uni versity Press YMCA Library Building Jaisingh Road New Delhi-110001
12. Ruddar Datt (2002), "Human Development and Economic Development "Deep & Deep Publication PVT.LTD.F-159, Reiouri garden, New Delhi-1
13. UNDP-Human Development Report-1990, 1993, 1995, 1996, 1997, 1998, 2001-02, 2002-03, 2003-04, 2007-08
14. www.undp.wilkipedia.com
15. www.mharogya.in

16. www.icds.gov.in
17. web-http://des.maharashtra.gov.in
18. www.rbi.org.in
19. www.dise.in
20. www.school report card.in
21. http://www.dpepmis.org.page No 32 & 33
22. महाराष्ट्र शासन, (2007–08 व 2009–10) ''महाराष्ट्राची आर्थिक पाहणी'' अर्थ सांख्यिकीय संचालनालय, नियोजन विभाग महाराष्ट्र शासन मुंबई.
23. डॉ. पु.ल.भांडारकर (1997) – 'सामाजिक संशोधन पध्दती', पिंपळापूरे प्रकाशन नागपूर.
24. महाराष्ट्र शासन 2005– 'महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी' – 2005
25. महाराष्ट्र शासन –(2005) महाराष्ट्र राज्य सांख्यिकीय गोषवारा 2000–01
26. डॉ.मुकुंद महाजन, सौ.सुरेखा बेहेरे – (2006) 'अर्थशास्त्र' निराली पब्लिशर्स पुणे.
27. महाराष्ट्र शासन (2008)– महाराष्ट्राचा प्रादेशिक असमतोल – शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई
28. महाराष्ट्र शासन–'महाराष्ट्राची आर्थिक आकडेवारी' – 2001 ते 2007 अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.
29.. जिल्हा सांख्यिकीय अधिकारी, बुलडाणा – 'जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन' – 2001, 2002, 2003, 2004, 2005
30. महाराष्ट्र शासन– विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय अमरावती निवडक शैक्षणिक सांख्यिकी 2000,2001,2002,2003
31.. संचालक शिक्षण संचालनालय पुणे –'शिक्षणावर दृष्टीक्षेप'(1990–91 आणि 2000–01)
32. Report on “Gendering Human Development Indices: Recasting the Gender Development Index and Gender Empowerment Measure for India is an ini tiative of the Ministry of Women and Child Development (MWCD), Government of India, supported by the UNDP and prepared by the Indian Institute of Public Administration (IIPA), New Delhi.

परिशिष्ट – 'क'

"जिल्हा नियोजन आणि मानव विकास निर्देशांकाच्या
सहसंबंधाचे अध्ययन, बुलडाणा जिल्ह्याच्या संदर्भात"

अनुसूची

डॉ. उदय श्री. काळे
संशोधक

उत्तरदात्याचे नांव :– ______________________

गावाचे / शहराचे नांव :– ____________ तालुका :– __________

1.वैयक्तीक सामान्य माहिती :–

<u>अ) कुटुंब प्रमुखाविषयी माहिती</u> :–

1) वय :– लिंग :–

2) व्यवसाय :– मुख्य पूरक

3) जात :– सामान्य / इमाव / अ.जा / वि.जा / भ.जा

4) धर्म :–

5) वैवाहिक दर्जा / अविवाहित / घटस्फोटीत / इतर :–

6) शिक्षण :–

7) व्यावसायिक कौशल्य / प्रशिक्षण असल्यास कोणते :–

8) वास्तव्याचा कालावधी जन्मापासुन एकूण वर्ष

9) कुटुंबाचा प्रकार :– विभक्त / संयुक्त / विस्तारीत

<u>ब) कौटुंबिक माहिती</u> :–

अ. क्र.	कुटुंबातील सदस्याची नावे	वय	लिंग	कुटुंब प्रमुखाशी नाते	व्यवसाय		साक्षर / निरक्षर साक्षर असल्यास शिक्षण	व्यावसायिक शिक्षण
					प्रमुख	गौण		
1.								
2.								
3.								
4.								
5.								

2. लिंगभेद व महिलांचा सहभाग :–

i)तुमच्या कुटुंबातील महिलांचा सहभाग खालील बांबीमध्ये असतो काय ?

घरगुती कामात ☐ उत्पन्नात ☐ निर्णयामध्ये ☐

3. आरोग्य, पोषण आणि स्वच्छताविषयक :–

i) तुमच्या गावामध्ये / तालुक्याच्या ठिकाणी पुरेश्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत काय? होय / नाही.

ii) आपण कोणत्या वैद्यकीय सुविधांचा उपयोग घेता?

अ) खाजगी डॉक्टरांची सेवा ब) सार्वजनिक / सरकारी वैद्यकीय सेवा

क) मांत्रिक / वैद्य

iii) आपल्या कुटुंबातील 6 वर्षाखालील बालकांना सर्व प्रकारचे लसीकरण झाले आहे काय? होय / नाही.

iv) आपल्या गावामध्ये आरोग्यसेवक / सेविका (एमपीडब्ल्यु / ए.एन.एम) नियमित भेटी देऊन आरोग्य तपासणी करून आरोग्य दिनदर्शीकावर स्वाक्षरी घेतात काय? होय / नाही

v) अ) तुमच्याकडे शौचालय आहे काय? होय / नाही

ब) कुटुंबातील व्यक्ती शौचालयाचा वापर करता काय? होय / नाही

vi) तुमच्या कुटुंबातील सदस्य जेवणाच्या आधी हात स्वच्छ धुतात काय? होय / नाही

vii) अ) पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत नळ / विहीर / हातपंप / इतर

ब) नळाच्या पाणी पुरवठा नियमीत होतो काय? होय / नाही

4) शिक्षण विषयक :–

i) तुमच्या कुटुंबातील मुलांचे शालेय शिक्षण कोणत्या शाळेत झाले? किंवा सुरू आहे.

1)जि.प. / न.पा शाळा 2)खाजगी अनुदानीत 3)खाजगी विनाअनुदानीत(कॉन्व्हेट)

5) सामाजिक व आर्थिक स्थिती विषयक :–

i) निवास / घराच्या बांधकामाचा प्रकार :–

अ) पक्के ब) कच्चे क) झोपडी

ii) तुमच्याकडील प्रकाश / विद्युत साधन कोणते?

विद्युत (इलेक्ट्रीक) / रॉकेल दिवा

iii) शेत / जमिन विषयक :– (हेक्टर मध्ये)

अ. क्र.	प्रकार	ओलीत क्षेत्र	कोरडवाहु	एकूण
1)	स्वतःच्या / कुटुंबाच्या मालकीची एकूण			
2)	अ) मालकीची स्वतः कसत असलेली ब) खंडाने / ठोक्याने घेतलेली क) बटाईची एकूण			

iv) रोजगार/व्यवसाय आणि उत्पन्न विषयक :–

अ. क्र	व्यवसायाचा प्रकार	कुटुंबातील काम करणाऱ्या व्यक्तींची संख्या	रोजगाराचे वार्षिक दिवस (प्रति व्यक्ती)	एकूण उत्पन्न (रूपयात)
1)	जमिनीची लागवड			
2)	शेतमजुर			
3)	शेती पूरक व्यवसाय			
4)	इतर मजूरी			
5)	उद्योग			
6)	नोकरी			
7)	व्यवसाय			
8)	इतर			
	एकूण			

v) जल सिंचनाचा स्त्रोत (ओलीत असल्यास) :–

विहीर/तलाव/तळे/काळवे/झरे/धरण/इतर

vi) वार्षिक खर्च (अंदाजे) :–

अ.क्र	बाब	वार्षिक खर्च	अ.क्र	बाब	वार्षिक खर्च
1	अन्नधान्य	रू	5	वाहतुक	रू
2	कापड	रू	6	शिक्षण	रू
3	वैद्यकिय खर्च	रू	7	इंधन/विद्युत	रू
4	घरभाडे	रू	8	कर्जाची परतफेड	रू

vii) बचत आणि गुंतवणूक :–

अ) वार्षिक बचत रू ब) गुंतवणूक प्रकार

1) अधिकोष 2) पोष्ट ऑफीस 3) शेअर्स 4) सरकारी कर्जरोखे

5) विमा 6) सोने व चांदी 7) रोकड 8) इतर

viii) शासनाकडून घेतलेल्या सवलती/अनुदान :–

अ.क्र	योजनेचे नाव	उद्देश/वर्ष	मिळालेले अनुदान
1			
2			
3			

ix) शासनाकडून आपल्या जिल्ह्याकरिता पुरेश्या निधीची तरतूद व खर्च केल्या जातो काय? होय/नाही

x) जिल्ह्यांचा भौतिक व नैसर्गीक संसाधनांचा उपलब्ध स्त्रोत लक्षात घेऊन मानवी भांडवल वाढविण्याचा प्रयत्न करण्याकरिता योजना राबविल्या जातात काय?

होय/नाही